# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | बारावे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४१ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : १६२**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.
# दिशा



वर्ष बारावे/अंक २/फेब्रुवारी २०११

## संपादकीय

## शिक्षण म्हणजे काय?

'शिक्षण म्हणजे काय' ते सांगण्याकरता जेवढी शाई सांडली असेल, तिचे मोजमापही करणे अशक्य आहे. आधुनिक काळात सभा, चर्चासत्रे, परिसंवाद, पुस्तकलेखन या सर्वांसाठी हे एक चांगले भांडवल उपलब्ध झाले आहे. शिक्षण म्हणजे शाळा हे समीकरण गृहीत धरल्यामुळे शाळांच्या इमारती, शिक्षकांची पात्रता, पगार, शालेय शुल्क, गणवेश, सरकारने शिक्का मोर्तब केलेल्या कवींची व लेखकांची पुस्तके या अवडंबरात ही चर्चा फिरत राहते. शिवाय बुद्धिजीवी म्हणजे अनेक कल्पनांची खाणच. आपण काहीतरी वेगळे सांगतोय या अविर्भावाने प्रत्येक बुद्धिजीवी या गोंधळात नवीन भर घालत असतो. विज्ञान, समानता, आर्थिक विषमता, महिला शिक्षण, ग्रामीण, उपेक्षित इत्यादी संकल्पनांची उधळण करून हा विषय आधिक खमंग करण्यात येतो. स्वातंत्र्योत्तर काळात गेली ६० वर्षे हे अव्याहतपणे चालू आहे. केंद्र व राज्यसरकारांनी अब्जावधी रुपये 'या शिक्षणाकरता' खर्च केले आहेत. ७५% हून आधिक जनता साक्षर झाली आहे. पाचव्या व सहाव्या वेतन श्रेणीच्या लाभ होऊनही सुमारे दहा वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. तरीही आजची परिस्थिती ६० वर्षांपूर्वी भारत जेवढा निरक्षर होता, त्यापेक्षा भयानक व भयावह झाली आहे. ब्रिटिशांनी केले नाहीत तेवढे जुलूम स्वतंत्र भारतात आज होताना दिसत आहेत. स्वातंत्र्य मिळवण्याकरता द्याव्या लागलेल्या किमतीपेक्षा आजच्या स्वातंत्र्याची मोजावी लागणारी किंमत ही सहस्रपटीने जास्त आहे.

चांगली संकल्पना उच्चारून किंवा मांडून समाजाचे परिवर्तन होत नसते. चाळीशी पंचेचाळीशी नंतर व्याधिमुक्त शरीर हवे असेल तर त्याची सुरुवात जन्मापासून करावी लागते. मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो निरागस, निष्पाप, निष्कलंक असतो. येणारा प्रत्येक दिवस ही निरागसता कमी करत असतो आणि प्रत्यक्ष जीवनाचे व्यस्त गणित त्याचे स्वतःचे निष्कर्ष काढायला उद्युक्त करत असते. या जटिल आणि कुटिल प्रक्रियेमध्ये राग, लोभ, मत्सर यांचे संतुलन साधणे हे जी प्रक्रिया शिकवते, करते ते खरे शिक्षण. शालेय शिक्षणात माहितीची जमवाजमव, संकलन, नियोजन, संक्रमण एवढेच होत असते. भाषेकरता वर्णमालेची माहिती, गणितासाठी आकड्यांची तोंडओळख तर विज्ञानाकरता व्याख्या व सूत्रांचा अभ्यास हा माहितीच्या नियोजनाचाच भाग असतो. पण शपथ घेऊन मनुष्य खरे बोलायला शिकत

(मलपृष्ठ २ वर)

नसतो. खरे बोलणारी जिवंत माणसे त्याच्या सहवासात यावी लागतात. खरे बोलणे हे जीवनमूल्य आहे. त्यांचे मोजमाप फायद्यातोटयात करता येत नसते. प्रत्यक्ष जीवनात फायद्यापेक्षा खरे बोलण्याचे तोटेच आधिक अनुभवायास येतात; तरीही खरे बोलण्याची ताकद, त्याच्या हेतुपुरस्सर केलेल्या संस्कारातूनच मिळू शकते.


आज समाजाने हे मूलभुत संस्कार व अशी संस्कारित माणसे हरवली आहेत. असे संस्कार देणारी शाळा म्हणजे आपले 'कुटुंब' आणि आपले आईवडील, पालक म्हणजे त्यांचे 'शिक्षक'. नोकरी हा केंद्रबिंदू असलेल्या समाजात या दोन्ही घटकांचा झपाट्याने ऱ्हास होतो. पाळणाघरे ही आईवडिलांच्या नोकरीच्या दृष्टीने केलेली व्यावहारिक सोय असते. 'पाळणा' हे एक संरक्षण असते आणि 'घर' हे संस्कारांचे छत्र असते. नुसता पाळणा किंवा नुसते घर 'आईवडिलांची' उणीव भरून काढू शकत नाही. पण पाळणा घरांची संख्या हेच मुळी आज प्रगती मोजण्याचा मापदंड झाला आहे. याचे पुढचे पाऊल म्हणजे 'आई' या संकल्पनेचेच अवमूल्यन करणे. वर उल्लेख केलेले बुद्धिजीवी आणि नाटक, सिनेमे या प्रक्रियेस हातभार लावत आहेत. आता विज्ञान इतके प्रगत झाले आहे की आईही भाड्याने घेता येते. जीवनातील सर्वच मूलभूत प्रक्रियांचे आता यांत्रिकीकरण व व्यापारीकरण केल्यानंतर त्यातून निर्माण होणारे 'अपत्य', - म्हणजे उत्पादन- ही याच मानसिकतेचा भाग असते. म्हणजेच साबण, संगणक व होणारे अपत्य हे बाजारपेठे मध्ये एकाच स्तरावर येऊन बसले आहे.

अप्पलपोटी, आत्मकेंद्रित समाजरचनेतून निर्माण झालेल्या 'अपत्यां'च्या बाबतीत चारित्र्य, नीती, मूल्ये या सर्व संकल्पना कालबाह्य व निकामी झाल्या असल्या तरीही आग्रह मात्र शाळांमधून चारित्र्यशील, जबाबदार, सुसंस्कृत नागरिक तयार करण्याचा. म्हणजे, जात्यात घालायचे दगड व अपेक्षा मात्र गव्हाच्या पीठाची!!

आपली समाजरचना ही किती सडली आहे हे सांगायला कोण्या नव्या भाष्यकाराची आज गरज नाही. आमचे सर्व भ्रष्टाचार हे कोण्याही अशिक्षित माणसाने केलेले नसून, उच्च विद्याविभूषित माणसांच्या सुपीक डोक्यातून ते साकारले गेले आहेत. आजचे राजा, कलमाडी, अशोक चव्हाण, स्वीस बँकेत पैसा ठेवणारे सर्व धनिक, प्राप्तिकर बुडविणारे नट व नट्या, पर्यावरण, समाज उद्धार, गरीबांचा उद्धार करायला निघालेल्या, परदेशी पैशांवर पोसल्या जाणाऱ्या आणि आपल्या देशाच्या प्रगतीला खीळ घालणाऱ्या अशासकीय संस्थाचे (एन. जी. ओ.) कर्ते हे कोणी खेडुत वा अशिक्षित नाहीत. महात्मा गांधींची शिकवण अहिंसा, सहिष्णुता व सत्याचा प्रयोगांची; पण आजचे गांधींचे समर्थन करणारे या सर्व मूल्यांना हरताळ फासून धटिंगणगिरी, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे, महागड्या गाड्यांचे तांडे बाळगणारे, पावलोपावली कायदा तुडवणारे राजकारणी धटिंगण. हा विरोधाभास ही आजच्या समाजाची शोकांतिका आहे.

माणसाला माणूस बनविते ते शिक्षण. या शिक्षणाची शाळा आहे घर आणि शिक्षक आहेत पालक. या सर्व परंपरागत संस्थांची नासधूस करून शाळा, शुल्क, शिक्षक व त्यांचे पगार, आणि त्या करता नवीन नवीन कायद्यांचे जंगल यांतून आपण निर्माण करत आहोत तो आजचा दिशाहीन सत्तालोलुप आत्मकेंद्रित चारित्र्यहीन 'शिक्षित' समाज !

●●●



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष बारावे / अंक २ / फेब्रुवारी २०११

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ८ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'दिशा' सूची २०१० | सचिन गराटे | ३ |
| २) | मराठी कादंबरीचा प्रवास | संतोष राणे | ९ |
| ३) | नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ प्रा. रिचर्ड अर्न्स्ट यांच्याशी दिलखुलास बातचीत | डॉ. सुधाकर आगरकर | १२ |
| ४) | श्री गणपती अथर्वशीर्ष | श्री. शं. बा. मठ | १८ |
| ५) | भारतीय संस्कृती- बीज, मंडिल व साधना | श्री. यशवंत साने | २६ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## सोशल नेटवर्किंग

सोशल नेटवर्किंग हा नव्याने अभ्यासला जात असलेला विषय असून 'द बर्थ ऑफ फेस बुकः सोशल नेटवर्किंग' या नावाचा सिनेमा २०१० सालात याच विषयावर प्रदर्शित झाला. कोलंबिया पिक्चर्स व सोनी पिक्चर्स इंटरनॅशनल या कंपन्यांनी काढलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शक डेव्हिड फिंचर हे आहेत तर पटकथा ॲरोना सोरकीन यांची आहे.

फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंगच्या संकेत स्थळांची विश्वव्यापकता इतकी मोठी आहे की परस्परसंपर्कावर त्यांनी घडवलेला परिणाम व या संपर्काचे बदलवून टाकलेले मूलभूत स्वरूप या विषयातील तज्ज्ञांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. संपर्क क्षमतांच्या इतर साधनांपेक्षा फेसबुक कसे वेगळे ठरले आहे यावर चित्रपटाचा आशय आधारित आहे. याचा सापेक्ष खुलेपणा हा व्यक्तिगत प्रश्नांवर परिणाम साधू लागला आहे. जोडले राहण्याची गरज ही आता एकीकडे आपले असे प्रकटीकरण व दुसरीकडे ते न केल्यास संकुचित वृत्ती या दोहोंत संघर्ष निर्माण करत आहे. या संदर्भातील हा चित्रपट नोंद घ्यावी असा आहे.

या बाबत

http://www.thesocialnetwork-movie.com हे संकेतस्थळ अभ्यासकांनी अवश्य पहावे.

<u>संदर्भ</u> : द लॅन्सेट : <u>खंड</u> ३७६ <u>क्र</u>. ९७५ ऑक्टो. ३०-नोव्हें. ५- २०१०

<u>पु.क्र. - १४५६</u>

## कला क्षेत्रातील जाणकारांसाठी

'एशियन आर्ट' हे कला, वस्तुसंग्रहालये प्राचीन काळापासून ते समकालापर्यंतचे कलाकार, कलात्मक वस्तू या संदर्भात निघणारे महत्त्वाचे वर्तमानपत्र आहे. आशियाई व इस्लामिक कला क्षेत्रातील चालू घडामोडी कोणत्या, एखाद्या नव्या पण आश्वासक अशा कलावंताची मुलाखत, वृत्तविभाग, मुख्य आंतरराष्ट्रीय कला प्रदर्शनांची रसग्रहणे, कला मेळाव्यांविषयी माहिती व या क्षेत्रात कलात्मक वस्तूंचा चालणारा लिलाव इ. विषयातील भरगच्च माहिती असते. कला क्षेत्रातील जगभरचे अभ्यासक या वृत्तपत्राची आतुरतेने वाट पाहतात.

लंडन येथून प्रकशित होणाऱ्या या वृत्तपत्राचे वर्षाला १० अंक निघतात. वस्तुसंग्रहालय व कलाकार मान्यवरांचे यातील लेख संग्राह्य व अभ्यासपूर्ण असतात. नोव्हेंबर २०१० (खंड १४ अंक:१) च्या अंकात रंगकर्ती चित्रा गणेश यांच्यावरील लेख, कैरो म्युझियम ऑफ इस्लामिक आर्ट या संस्थे विषयी, एशियन आर्ट इन मुंबई इ. वाचनीय साहित्य आहे. कला विषयात रस असणारांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्यांची माहितीही यातून मिळू शकते.

एशियन आर्ट न्यूजपेपर्स पर्ल लि. यांच्यातर्फे प्रकाशित होणाऱ्या या वर्तमानपत्राचे संकेत स्थळ :

www.asian-newspaper.com हे असून फेसबुक व ट्विटरवरही या वृत्तपत्राची माहिती आहे.

<u>संदर्भ</u> - एशियन आर्ट - नोव्हेंबर २०१०

# 'दिशा' सूची २०१०

- संकलन सचिन गराटे

| क्र. | लेखक | लेखाचे शीर्षक | महिना | व/अंक | पृ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आगरकर, सुधाकर | १ ऑक्सफर्डच्या बोटॅनिकल गार्डनमधील तीन तास | मे | ११/६ | ३-६ |
| | | २ एक ऐतिहासिक घटना एका ऐतिहासिक शहरात | नोव्हे. | ११/१२ | ९-११ |
| | | ३ गुआंगडाँग विज्ञान केंद्राला भेट | ऑक्टो. | ११/११ | ८-१० |
| | | ४ डिडकॉटचे औष्णिक विद्युत केंद्र | सप्टे. | ११/१० | २६-२८ |
| | | ५ रूदरफोर्ड ॲपलटन प्रयोगशाळेची अविस्मरणीय भेट | जुलै | ११/८ | ३-५ |
| २ | आठल्ये, श्रीनिवास | १ व्यवस्थापनातील विचारवंत (पूर्वार्ध) | मार्च | ११/४ | ३-६ |
| | मेघःश्याम | २ व्यवस्थापन शास्त्रातील विचारवंत (उत्तरार्ध) | एप्रिल | ११/५ | ३-६ |
| ३ | कर्णिक, प्रदीप | १ १०+२+३ पॅटर्नपेक्षा वेगळा पॅटर्न हवा आहे. | ऑग. | ११/९ | १७-२१ |
| | | २ 'झुंड': दोन संस्कृतीतील सनातन झगडा. | जून | ११/७ | ११-१९ |
| | | ३ प.पू.श्री.श्री.द. (तथा) श्री मामासाहेब देशपांडे यांचे नाट्यलेखन | जुलै | ११/८ | ११-१५ |
| ४ | खरे, सुनीता | १ उत्तररामचरित्कर्ता भवभूती | जून | ११/७ | ६-१० |
| ५ | गणपुले, सुनीता | १ संत साहित्यातील काही 'कण' व काही 'क्षण' (भाग१) | जून | ११/९ | ७-९ |
| | | २ संत साहित्यातील काही 'कण' व काही 'क्षण' (भाग२) | सप्टे. | ११/१० | १९-२१ |
| | | ३ संत साहित्यातील काही 'कण' व काही 'क्षण'(भाग३) | ऑक्टो. | ११/११ | ११-१३ |
| | | ४ संत साहित्यातील काही 'कण' व काही 'क्षण'(भाग४) | नोव्हे. | ११/१२ | १४-१८ |
| | | ५ स्त्री जीवनात विज्ञान पहाट | डिसे. | १२/१ | ३३-३७ |
| ६ | गराटे, सचिन | १ 'दिशा' सूची २००९ | फेब्रु. | ११/३ | २६-३२ |
| ७ | गांगल, बाळ | १ प्राचीन, मध्ययुगीन भारतातील शास्त्र आणि तंत्रज्ञान | जुलै | ११/८ | १८,१९ |
| | | २ प्राचीन, मध्ययुगीन भारतातील शास्त्र आणि तंत्रज्ञान | ऑग. | ११/९ | १४-१६ |
| | | ३ प्राचीन, मध्ययुगीन भारतातील शास्त्र आणि तंत्रज्ञान | सप्टे. | ११/१० | १७-१८ |
| | | ४ मराठीचे मारेकरी आपण सारे | मे | ११/६ | ७-९ |
| | | ५ लीलावती आणि Hypatia | नोव्हे. | ११/१२ | ६-८ |

माणसाची चौथी मूलभूत गरज म्हणजे पुस्तक.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६ संत आणि Saints | ऑक्टो. | ११/११ | १९-२१ |
| ८ | गिल्डा, गीता | १ प्रभावी बालशिक्षण आणि प्रभावी शिक्षक एक चिकित्सक अभ्यास | मे | ११/६ | १२-१४ |
| ९ | गोरे, अमोल आणि मूर्ती, गुरुप्रसाद | १ जागतिक स्पर्धात्मकता गुणांकन २०१० : बोध व संकेत | ऑक्टो. | ११/११ | ३-७ |
| १० | जोशी, सुभाष | १ 'वांद्रे वरळी सागरी सेतू: एक अभियांत्रिकी आश्चर्य | नोव्हे. | ११/१२ | २०-२२ |
| ११ | जोशी, शरद | १ साहित्य - जगत | फेब्रु. | ११/३ | १७-२१ |
| | | २ साहित्य - जगत | एप्रिल | ११/५ | १९-२० |
| | | ३ साहित्य - जगत | डिसें. | १२/१ | ९-१० |
| १२ | देशमुख, विशाखा | १ बालशिक्षणातील संगीत व नाट्याचा वापर. | जाने. | ११/२ | ८-९,१८ |
| १३ | देशमुख, मानसी | १ कालाय तस्मै नम: | एप्रिल | ११/५ | १४-१५ |
| १४ | नवरे, जान्हवी आणि राजेबहादूर, प्रज्ञा | १ Will, अर्थात मृत्युपत्र | जून. | ११/७ | ३-५ |
| १५ | नाडकर्णी, नरेंद्र | १ इंटिग्रल योगाचे ज्येष्ठ साधक, ऋग्वेद भाष्यकार टी. व्ही. कपाली शास्त्री (लेखांक १) | मे | ११/६ | १७-२६ |
| | | २ इंटिग्रल योगाचे ज्येष्ठ साधक, ऋग्वेद भाष्यकार टी. व्ही. कपाली शास्त्री (लेखांक २) | सप्टे. | ११/१० | ११-१६ |
| | | ३ इंटिग्रल योगाचे ज्येष्ठ साधक, ऋग्वेद भाष्यकार टी. व्ही. कपाली शास्त्री (लेखांक ३) | ऑक्टो. | ११/११ | १४-१८ |
| | | ४ इंटिग्रल योगाचे ज्येष्ठ साधक, ऋग्वेद भाष्यकार टी. व्ही. कपाली शास्त्री (लेखांक ४) | डिसें | १२/१ | १८-२१ |
| | | ५ महायोगी श्री अरविंद आणि महाराष्ट्र | एप्रिल | ११/५ | ७-१३ |
| १६ | नीळकण्ठसुत | १ गझालहरी (भाग १) | जुलै | ११/८ | २६-३३ |
| | | २ गझालहरी (भाग २) | ऑग | ११/९ | २२-२८ |
| | | ३ चर्पटपंजरिका स्तोत्र | सप्टे. | ११/१० | ३२-३३ |
| | | ४ शिवापराधक्षमापनस्तोत्रम् | मार्च | ११/४ | १०-११ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | पडळकर, सुचिता | १ बालशाळेतील शिक्षकाची सृजनशीलता | जाने. | ११/२ | ३-७ |
| १८ | पाटील, पी. एम् | १ व्यक्तिविशेष: श्री रामचंद्र सदाशिव ठाकूर | नोव्हे. | ११/१२ | १९-२२ |
| १९ | पारसनीस-गुप्ते, राधिका | १ सावरकरांच्या ऐतिहासिक उडीची शताब्दी | ऑक्टो | ११/११ | |
| २० | बारसे, नारायण | १ १९ व २० व्या शतकातील मराठी व्याकरण, शब्दकोश आणि ज्ञानकोशांचा संक्षिप्त इतिहास (अनु. मोहन पाठक) | डिसें. | १२/१ | ३-८ |
| २१ | बेडेकर, विजय | १ चिंतन आणि चिंता | मे | ११/६ | १०-११ |
| | | २ धर्म, संस्कृती आणि विज्ञान | फेब्रु. | ११/३ | २२-२५ |
| | | ३ सांस्कृतिक पुनरुजीवनाची गरज | डिसें. | १२/१ | १६-१७ |
| २२ | भिडे, आशा | १ अमेरिकन शिष्टाचार, सभ्यता, शिस्त आणि स्वच्छता | जुलै | ११/८ | ३३-३५ |
| | | २ आमचे द. भि. सर... | ऑग. | ११/९ | १०-१३ |
| | | ३ दिल्ली, आग्रा, मथुरा वृंदावन, वैष्णवदेवी | जून | ११/७ | २०-२४ |
| | | ४ सलाम हिंदवी स्वराज्याला | नोव्हे. | ११/१२ | १२-१३ |
| २३ | मठ, शं. बा. | १ उपनिषदातील विचार (लेखांक ३) | फेब्रु. | ११/३ | ३-७ |
| | | २ उपनिषदातील विचार (लेखांक ४) | मार्च | ११/४ | १५-१८ |
| | | ३ उपनिषदातील नीती विचार (लेखांक ५) | एप्रिल | ११/५ | २५-२९ |
| | | ४ उपनिषदातील नीती विचार (लेखांक ६) | मे | ११/६ | २७-३० |
| | | ५ उपनिषदे-अर्थात-ब्रम्हविद्या | जाने | ११/२ | १३-१८ |
| | | ६ मानवासमोरील प्रश्नचिन्ह | नोव्हे. | ११/१२ | ३-५ |
| | | ७ यक्ष व युधिष्ठिर संवाद | सप्टें. | ११/१० | ३-१० |
| | | ८ सांस्कृतिक जीवन आणि राष्ट्राची घडण | ऑग. | ११/९ | ३-६ |
| | | ९ श्रीमत् आद्य शंकराचार्य प्रणित अपरोक्षानुभूति -संक्षिप्त गोषवारा | जून | ११/७ | २५-२९ |
| | | १० ज्ञान आणि विज्ञान समन्वय वेदान्त | जुलै | ११/८ | ६-१० |
| २४ | माने, यशवंत | १ आत्मा | जुलै | ११/८ | १६-१७ |
| | | २ कन्यादान | मार्च | ११/४ | १२-१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३ चंचलता | जाने. | ११/२ | २४-२५ |
| | | ४ दुःख | सप्टे. | ११/१० | २२-२५ |
| | | ५ परमेश्वर आणि आनंद | मे | ११/६ | १५-१६ |
| | | ६ भक्ती | डिसें | १२/१ | ३०-३२,३७ |
| | | ७ सन्यास | एप्रिल | ११/५ | १६-१८ |
| | | ८ स्वर्ग | नोव्हे. | ११/१२ | २८-२९ |
| २५ | ठाकूर, अशोक रा. | १ निसर्गरम्य केळवे | मार्च | ११/४ | ७-९ |
| २६ | लागू, सुरेंद्र | १ आदरांजली (श्री. विश्वनाथ उपाख्य बंडोपंत शेंड्ये) | मार्च | ११/४ | २८-३१ |
| | | २ जीवेत शरदः शतम! (सौ. मंजिरी देव) | एप्रिल | ११/५ | २१-२४ |
| २७ | साने,यशवंत | १ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | जाने. | ११/२ | १९-२३ |
| | | २ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | फेब्रु | ११/३ | ८-१६ |
| | | ३ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | मार्च | ११/४ | १९-२७,३९ |
| | | ४ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | एप्रिल | ११/५ | ३०-३६ |
| | | ५ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | मे | ११/६ | ३१-३९ |
| | | ६ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | जून | ११/७ | ३०-३५ |
| | | ७ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | जुलै | ११/८ | २०-२५ |
| | | ८ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | ऑग. | ११/९ | २९-३५ |
| | | ९ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | सप्टें | ११/१० | २९-३१ |
| | | १० भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | ऑक्टो. | ११/११ | २२-२७ |
| | | ११ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | नोव्हे. | ११/१२ | २३-२७ |
| | | १२ भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | डिसें. | १२/१ | २२-२९ |

तक्ता क्र. १ – संपादकीय

| महिना | वर्ष/अंक | संपादकीय |
|---|---|---|
| जानेवारी | ११/२ | आत्महत्यांचा वेध |
| फेब्रुवारी | ११/३ | सुरुवात स्वत:पासून करू या! |
| मार्च | ११/४ | जया अंगी मोठेपण |
| एप्रिल | ११/५ | शिक्षणहक्क विधेयक |
| मे | ११/६ | असंसर्गजन्य रोगांचा संसर्ग |
| जून | ११/७ | शिक्षणाचा सावळा गोंधळ- शेवटाची सुरुवात |
| जुलै | ११/८ | सावरकर - प्रेरणास्रोत |
| ऑगस्ट | ११/९ | ऑगस्ट महिमा |
| सप्टेंबर | ११/१० | सणवारांचे सांस्कृतिक अध:पतन |
| ऑक्टोबर | ११/११ | पण लक्षात कोण घेतो! |
| नोव्हेंबर | ११/१२ | संस्कृतचे ऋण |
| डिसेंबर | १२/१ | सोहळे, भाषा आणि गुलामी |

तक्ता क्र. २ – परिसरवार्ता

| महिना | वर्ष/अंक | पृष्ठ | वृत्त संकलक |
|---|---|---|---|
| जानेवारी | ११/२ | ३२-४० | |
| फेब्रुवारी | ११/३ | ३३-३९ | |
| मार्च | ११/४ | ३७-४० | प्रा. प्रज्ञा राजेबहादर, श्री. चंद्रकांत शिंगाडे |
| एप्रिल | ११/५ | ३२-४० | सौ. प्रिती कुलकर्णी, डॉ. मुग्धा कुलकर्णी, श्री. चंद्रकांत शिंगाडे |
| मे | ११/६ | ३८ | प्रा. प्रज्ञा राजेबहादूर |
| जून | ११/७ | ३६-३९ | श्री. रामचंद्र लक्ष्मण शिंदे |
| जुलै | ११/८ | ३६-३९ | |
| ऑगस्ट | ११/९ | ३६-४० | सौ. विजया भंडारे, डॉ. मुग्धा कुलकर्णी, श्री. चंद्रकांत शिंगाडे |
| सप्टेंबर | ११/१० | ३४-३९ | |
| ऑक्टोबर | ११/११ | ३० | श्री. चंद्रकांत शिंगाडे, सौ. मैत्रेयी शेवडे |
| नोव्हेंबर | ११/१२ | ३०-४० | श्री. चंद्रकांत शिंगाडे |
| डिसेंबर | १२/१ | ३८-३९ | श्री. चंद्रकांत शिंगाडे |

तक्ता क्र. – ३ पुस्तक परिचय

| क्र. | मूळ ग्रंथ | लेखक | प्रकाशक | परीक्षणकर्ता | परीक्षणाचे शीर्षक | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आचार्य अत्रे: महाराष्ट्राचे चलदंड व्यक्तिमत्त्व | वि. र. काळे | वसंत बुक स्टॉल मुंबई | शरद जोशी | साहित्य-जगत | फेब्रु. | १७ |
| २ | ग्रंथकल्याणी | जितेंद्र भामरे आणि प्रशांत मुल्हेकर | कल्याण सार्व. वाचनालय, कल्याण | मोहन पाठक | ग्रंथकल्याणी: कल्याण सार्व. वाचनालयाचा इतिहास | जाने. | २६-२७ |
| ३ | झुंड | शरणकुमार लिंबाळे | | प्रदीप कार्णिक | झुंड: दोन संस्कृतीतील सनातन झगडा | जून | ११-१९ |
| ४ | भावसाधना | | श्रीसमर्थ सेवक मंडळ, ठाणे | सुरेंद्र लागू | 'भावसाधना' - संस्कारक्षम निर्मिती | जाने | १०-१२ |
| ५ | मंजिल-ए-मक्सूद पाकिस्तान | प्रवीण कारखानीस | नवचैतन्य प्रकाशन, मुंबई | शरद जोशी | साहित्य - जगत | एप्रिल | १९-२० |
| ६ | योगतारावली | श्रीमत् आद्य शंकराचार्य | | शं. बा. मठ | योग तारावली (ग्रंथ परिचय) | डिसें. | ११-१५ |

### नाश पर्यावरणाचा

पर्जन्यवनांमध्ये भरपूर प्रमाणात नैसर्गिक संपत्ती दडलेली असली तरी या आधुनिक काळात तिचे संरक्षण व संवर्धन होण्याऐवजी औद्योगिक प्रगतीच्या नावाखाली या वनांचा प्रचंड प्रमाणात नाश होत आहे. मानव स्वत:च्या स्वार्थासाठी ही वने नष्ट करत आहे. व्यापारी कारणांसाठी होणारी वृक्षतोड, कृषी भूमीचे पर्जन्यवन भूमीवर होणारे अतिक्रमण, लोकसंख्येनुसार जमिनींचे वाटप तर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे कर्ज फेडण्यासाठी निधी उभा करण्याच्या दृष्टीने होणारी जंगलतोड; तसेच गरीब देशातून स्वतात माल खरेदी करून त्यावर नफा मिळवून तो श्रीमंत राष्ट्रांना विकणे या अशाप्रकारच्या व्यवहारांमुळे ४० तर ४५ टक्के पर्जन्यवने नष्ट झाली आहेत. पुढेही असेच सुरू राहिले तर पर्यावरणाचा समतोल राखणे कठीण होईल. कारण दरवर्षी जगातील ४. १ कोटी एकर क्षेत्रातील पर्जन्यवने नष्ट होत आहेत.

- संग्रहातून

प्रवास सहनशीलता शिकवतो. - बेंजामिसन डिझायरोडी

# मराठी कादंबरीचा प्रवास

*मराठी कादंबरीचा धावता इतिहास या लेखात सादर केला आहे - संपादक*

अव्वल इंग्रजीतील कथा वाङ्मयातूनच कादंबरीची कल्पना रुजली आणि तिचा सकसतेच्या दिशेने विस्तार झाला. 'कादंबरी' हा शब्द इंग्रजीतील Novel या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून उपयोजिण्यात आला. हरि केशवजी यानी बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' चे केलेले भाषांतर ज्याला 'कादंबरी' म्हणता येईल, असा पहिला ग्रंथ म्हणजे 'यात्रिक क्रमण' होय. यानंतर बाबा पद्मजी यांची 'यमुना पर्यटन' ही कृती १८५७ साली प्रसिद्ध झाली. १८२९ साली प्रकाशित झालेल्या महाराष्ट्र भाषेच्या कोशात 'कादंबरी' हा शब्द समाविष्ट करण्यात आलेला होता.

'मुक्तामाला' ही रंजनप्रधान कादंबरी 'पहिली' कादंबरी म्हणून गौरविली गेली. लेखक लक्ष्मणशास्त्री मोरेश्वर शास्त्री हळबे यांनी १८६१ साली लिहिलेल्या 'मुक्तामाला' कादंबरीत संस्कृतातील 'कादंबरी' या बाणभट्टाच्या गद्यग्रंथाची कल्पना होती. 'रत्नप्रभा' (१८६६), 'मंजुघोषा' (१८६८ : ना.स. रिसबुड), 'विचित्रपुरी' (१८७०: केशव लक्ष्मण बोरवेकर), 'मित्रचंद्र' (पां. गो. पारखीः १८८०) अशा अनेक अद्भुतरम्य व रंजक कादंबऱ्यांची परंपराच अत्यंत अल्प काळात निर्माण झाली.

अद्भुतरम्य कादंबऱ्यांबरोबरच ऐतिहासिक कादंबऱ्यांचाही प्रवाह निर्माण झाला होता. रा. भि. गुंजीकर यांची १८६७ साली प्रसिद्ध झालेली 'मोचनगड' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी. १८६७ ते १९२० या काळात गुंजीकर, हरी नारायण आपटे, नारायण हरी आपटे, चि.वि. वैद्य, वि.वा. हडप, नाथमाधव, सहकारी कृष्ण यांच्या अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या रुपाने हरिभाऊंनी मराठेशाहीची व भारताच्या उत्कर्ष काळाची स्फूर्तिदायक स्मृती जागृत केली. 'वज्राघात' सारखे मनोविश्लेषण मराठीत प्रथमच अवतरले. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रीयांच्या मनात निर्माण झालेल्या राष्ट्रीय प्रेमाच्या भावनेतून राष्ट्राचा इतिहास व संस्कृती यांच्याबद्दल आदर व अभिमान व्यक्त करण्याची स्फूर्ती लेखकांना मिळाली. १८८५ ते १९१५ हा सुमारे ३० वर्षांचा कालखंड 'हरी नारायण आपटे' युग म्हणून मराठी कादंबरीच्या इतिहासात नोंदवला जातो.

हरि नारायण व वामन मल्हार यांच्या दरम्यानचे महत्त्वाचे लेखक म्हणजे नाथमाधव, नारायण हरि आपटे, वि. स. गुर्जर, सी. के. दामले, बा.सं. गडकरी इ. वामन मल्हारांच्या 'रागिणी', 'सुशीलेचा देव' यासारख्या कादंबऱ्यांनी वाचकांना बौद्धिक आनंद दिला.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी हरिभाऊंना 'सामाजिक कादंबरीचे जनक' तर वामन मल्हाराना 'तात्विक कादंबरीचे जनक' असे संबोधिले. वामन मल्हार जोशी आणि डॉक्टर केतकर यांच्या बरोबरीनेच ना. सी. फडके यांनी मराठी कादंबरीच्या क्षेत्रात पदार्पण केले. 'अल्ला हो अकबर', 'कुलाब्याची दांडी' या सारख्या शंभराहून अधिक कादंबऱ्या ना.सी. फडके यांनी लिहिल्या. नायक नायिकांच्या निर्मितीची परंपरा फडक्यांप्रमाणेच माडखोलकर, वि.स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, मामा

मृत्यू प्रत्येकाला आहे, परंतु खऱ्या अर्थाने जगणे सगळ्यांनाच जमते असे नाही.

वरेरकर आणि श्री. ना. पेंडसे यांच्या प्रारंभीच्या कादंबऱ्यापर्यंत अखंड टिकून राहिलेली दिसते.

'ज्ञानपीठ' पारितोषिक मिळवणाऱ्या वि.स. खांडेकर यांची 'ययाती' ही कादंबरी १९५९ साली आली. परंतु १९६० नंतरच्या कादंबरी-विश्वावर 'ययाती' चा परिणाम फार मोठा आहे. 'ययाती' मुळे मराठीत पौराणिक कादंबरीची एक नवी परंपरा अस्तित्वात आली. शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय', रणजित देसाई यांची 'राधेय', इतकेच नव्हे तर माडखोलकरांची 'जन्मदुर्दैवी' व 'रेणुका', आनंद साधल्यांची 'वैदेही' व 'अंजनीचा सुत', परांजप्यांची 'युगावेगळी' अशा अनेक कादंबऱ्यांची साक्ष मिळू शकते.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात व्यक्तिवादी तसेच राष्ट्रवादी, गांधीवादी व समाजवादी प्रेरणांतून विभावरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर' 'सुशीलेचा देव', 'इंदू काळे, 'सरला भोळे', 'क्रौंचवध', 'बळी' यासारख्या काही कादंबऱ्याची निर्मिती झालेली दिसते.

१९३९ साली प्रसिद्ध झालेली 'रणांगण' ही विश्राम बेडेकर यांची कादंबरी, जी तंत्र, आशय आणि कादंबरीतून व्यक्त होणारे जीवन दर्शन या सर्व बाबतीत वेगळी आहे. त्यामुळे मराठी कादंबरीच्या इतिहासात ती मैलाचा दगड ठरते. 'रणांगण' प्रमाणेच अगदी वेगळा असा तंत्र विषयक प्रयोग करणारी 'रात्रीचा दिवस' ही मर्ढेकरांची वेगळ्या वाटेने जाणारी कादंबरी उल्लेखावी लागेल.

गो. नी. दांडेकर यांच्या 'पडघवली' (१९५५) किंवा 'पूर्णामायची लेकरे' (१९५६), र. वा. दिघे यांची 'पाणकळा' (१९३९) किंवा 'आई आहे शेतात' (१९५७), व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५), किंवा रणजित देसाई यांची 'माझा गाव' (१९६०), शंकर पाटील यांची 'टारफुला' (१९६४), मधु मंगेश कर्णिक यांची 'देवकी' (१९६३), जयवंत दळवी यांची 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४), अण्णाभाऊ साठे यांची 'रानगंगा', डॉ. रंगनाथ देशपांडे यांची 'वेडी बाभळ' (१९६५) इत्यादी प्रादेशिक कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. १९६० नंतर 'चक्र', 'धग', 'इंधन', 'माहीमची खाडी', 'टारफुला', अशा प्रखर वास्तवाचे भेदक चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या निर्माण होऊ लागल्या. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला', भाऊ पाध्ये यांची 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर', चि.त्र्यं. खानोलकर यांची 'अजगर', कमल देसाई यांची 'हॅट घालणारी बाई' व 'काळा सूर्य', ए. वि. जोशी यांची 'काळोखाचे अंग', किरण नगरकर यांची 'सात सक्कं त्रेचाळीस' केशव मेश्राम यांची 'हकिकत व जटायू (१९७२) या कादंबऱ्यादेखील सामाजिक वास्तवाशी निगडित असलेली आशयसूत्रे व्यक्त करणाऱ्या आहेत.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर राजकारण वा राजकीय चळवळींचे प्रतिबिंब पडलेल्या कादंबऱ्या म्हणजे ए.वि. जोशी यांची 'रानभूल', पु.भा. भावे यांची 'आग', मनोहर शहाणे यांची 'झाकोळ', अरुण साधू यांची 'सिंहासन', भाऊ पाध्ये यांची 'डोंबाऱ्याचा खेळ' या होत.

दलितांची कादंबरी समृद्ध करणारे प्रमुख लेखक म्हणजे अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात. 'काजळी रात्र', 'फकिरा', 'सूड', 'हकिकत आणि जटायू', 'निष्ठा', 'बलिदान', 'रमाई', या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. दलित कादंबरीमध्ये स्त्रीलेखिका अभावानेच आढळतात. प्रा. सुशिला जाधव यांची 'सुबुद्ध', सुगंधा शेंडे यांची 'फिपुली' (१९८७) अशा काही बोटावर मोजण्याइतपत स्त्री लेखिका आढळतात.

रमेश इंगळे-उत्रादकर यांच्या 'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शंकर सखाराम यांची 'सेझ' सर्वांच्या चर्चेचा विषय ठरली. लेखक सदानंद देशमुख, सदानंद मोरे, सचिन कुंडलकर, प्रवीण दशरथ बांदेकर, रंगनाथ पठारे, राजन गवस, रमेश अंधारे, रवींद्र शोभणे यांनी सध्याच्या कादंबरी विश्वात मोलाची भर

घातली. कोसलाकार भालचंद्र नेमाडे यांची 'हिंदू - जगण्याची समृद्ध अडगळ' कादंबरी वादाचा विषय ठरली आहे.

मराठी कादंबरीच्या विकासाबाबत साकल्याने विचार करता असे म्हणावे लागते की उत्तुंग प्रतिभेच्या कादंबरीकारांचा अभाव अजूनही तीव्रतेने जाणवतो आहे. पण असे असले तरी, सध्या अत्यंत संवेदनशील वृत्तीच्या, तीव्र बुद्धिमत्तेच्या, धीटपणे कोणत्याही अनुभवाचे दर्शन घडवू शकणाऱ्या आणि जागतिक पातळीवरील वाङ्मयाच्या क्षेत्रातील विविध प्रवृत्ती-प्रवाहांची जाण असणाऱ्या कादंबरीकारांची संख्या हळूहळू वाढत असल्यामुळे अधिक मोठी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य मराठी कादंबरीत येत आहे.

**संदर्भ :**


१) मराठी कादंबरीचे पहिले शतक - कुसुमावती देशपांडे

२) धार आणि काठ : नरहर कुरुंदकर

३) मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास - प्रभाकर वासुदेव बापट, नारायण वासुदेव गोडबोले

४) मराठी कादंबरीचा इतिहास - डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर



- प्रा. संतोष राणे
मराठी विभाग,
जोशी बेडेकर महाविद्यालय ठाणे


●●●

**विद्या प्रसारक मंडळाची Digital Repository आता Open DOAR च्या निर्देशिकेत समाविष्ट**

DSpace या मुक्त प्रणाली (Open Source Software) च्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या Digital संग्रहा (Digital Repository) मध्ये मंडळाच्या विविध महाविद्यालयांमध्ये आयोजित झालेल्या चर्चासत्रे / कार्यशाळा यामध्ये प्रसिद्ध झालेली प्रकाशने, भाषणे (लिखित / दृक श्राव्य स्वरुपात), संशोधनपर लेख, प्रबंध, गणपत्रिका, गण पुस्तके इत्यादी साहित्य प्रसिद्ध आहे. आता हा सर्व संग्रह Open DOAR (The Directory of Open Access Repositories) च्या निर्देशिकेच्या यादीत समाविष्ट करण्यात आला आहे; त्यामुळे आता जगभरातील संशोधक या संग्रहाचा लाभ घेऊ शकतील.

Open DOAR ही एक अधिकृत शैक्षणिक मुक्त Digital संग्रहाची निर्देशिका आहे. या निर्देशिकेत जगभरातील आशिया, कॅरेबिअन, मध्य अमेरिका युरोप, उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका अशा विविध खंडांतील सर्वोच्च स्थानावरील तसेच महत्वाच्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांच्या सुमारे १८०० Digital संग्रहांचा समावेश आहे. या संकेत स्थळा वर विविध विषयावरील जगभरात मोफत उपलब्ध असलेले संशोधनपर लेख, पुस्तके, शोध निबंध, दृक श्राव्य साहित्य, पेटंट इत्यादींचा संग्रह आहे. Open DOAR ही केवळ एक निर्देशिकाच नसून यामध्ये वाचकासाठी दर्जेदार शोध पद्धती उपलब्ध करून दिलेली आहे की ज्यामुळे जास्तीत जास्त सुसंगत माहिती वाचकांना मिळू शकते; आणि आता या Open DOAR मधील सर्व दर्जेदार आंतरराष्ट्रीय संस्थांच्या यादीत विद्या प्रसारक मंडळाचा समावेश होणे ही निश्चितच अभिमानाची व आनंदाची बाब आहे.

# नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ प्रा. रिचर्ड अर्न्स्ट यांच्याशी दिलखुलास बातचीत

*नोबल पुरस्कार मिळणाऱ्या शास्त्रज्ञाशी गप्पा मारून त्यांची मते जाणून घेण्याचा दुर्मीळ योग डॉ. सुधाकर आगरकर यांना लाभला त्या गप्पांचे हे शब्दांकन - संपादक*

भावी पिढीला विज्ञान संशोधनाकडे आकर्षित करण्यासाठी आजकाल अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. आशिया खंडातील देशांनी अर्वाचीन विज्ञानाला म्हणावा तसा हातभार लावलेला नाही. विज्ञानातील बरेचसे महत्वपूर्ण शोध युरोप आणि अमेरिकेतच लागलेले आहेत. हे चित्र अलीकडच्या काळात बदलत आहे. आशिया खंडातील अनेक विकसनशील देशांनी विज्ञान संशोधनासाठी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच संशोधनासाठी चांगली आर्थिक तरतूद दखील केलेली आहे. असे जरी असले तरी, प्रज्ञावंत विद्यार्थी बहुसंख्येने विज्ञानेतर विषयाकडेच वळताना दिसतात. हे चित्र बदलण्यासाठी अशिया खंडातील होतकरू विद्यार्थ्यांची आणि शास्त्रज्ञांची भेट करून द्यावी अशी कल्पना सप्टेंबर २००५ मध्ये मांडण्यात आली. त्या कल्पनेला मूर्त स्वरूप आले असून मागील चार वर्षांपासून आशिया विज्ञान शिबीर (Asian Science Camp) आयोजित करण्यात येत आहे. पहिले शिबीर (२००७) तैवानमध्ये, दुसरे शिबीर (२००८) इंडोनेशियात तर तिसरे शिबीर (२००९) जपानमध्ये आयोजित केले गेले. यावर्षीचे शिबीर भारतातील मुंबई शहरात आयोजित केले गेले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिचर्सच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने या शिबिराचे यजमानपद स्वीकारले होते आणि हे शिबीर वाशी, नवी मुंबई येथे येथे ऑगस्ट १७ ते २१ च्या कालावधीत भरविण्यात आले होते. या शिबीरात मार्गदर्शन करण्यासाठी स्विन्झरलँड मधील प्रथितयश शास्त्रज्ञ प्रा. रिचर्ड अर्न्स्ट यांना पाचारण करण्यात आले होते. प्रा. अर्न्स्ट हे व्यवसायाने रसायनशास्त्रज्ञ असून त्यांनी न्यूक्लिअर मॅग्नेटिक रेझोनन्स (Nuclear Magnetic Resonance) या क्षेत्रात काम केले आहे. या तत्वाचा उपयोग करून त्यांनी बऱ्याच रासायनिक द्रव्यांची रचना माहीत केली. त्यानंतरच्या काळात या तंत्राचा उपयोग करून मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग (Magnetic Resonance Imaging) करता येते हे लक्षात आले. त्याच्या आधारे शरीरातील भागांचे निरीक्षण करून आतील अवयवांची माहिती मिळविता येते. त्यांच्या या महत्वपूर्ण कामगिरीबद्दल त्यांना १९९१ चे रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. आशिया विज्ञान शिबीराच्या निमित्ताने त्यांच्याशी दिलखुलास चर्चा करण्याची संधी मिळाली. त्या चर्चेतील महत्वाचा भाग प्रश्नोत्तर स्वरूपात वाचकांसाठी येथे सादर करीत आहे.

<u>प्रश्न</u>: नमस्कार, प्रा. अर्न्स्ट, भारतात आपले स्वागत आहे. आशिया विज्ञान शिबीराच्या निमित्ताने आपण भारतात आलात. येथे आल्यावर आपल्याला काय वाटले?

<u>उत्तर</u>: आता मी आशिया विज्ञान शिबिराच्या निमित्ताने भारतात आलो असलो, तरी ही काही माझी पहिली भेट नाही. मी भारतात अनेकदा येऊन गेलो. खरे तर मी जवळजवळ दरवर्षी भारतात येत असतो. मला भारताबद्दल नितांत प्रेम आणि आदर आहे.

<u>प्रश्न</u>: तुमचे उत्तर ऐकून मला आनंद झाला, त्याचबरोबर युरोपात राहणाऱ्या आणि काम करणाऱ्या शास्त्रज्ञाला भारताबद्दल प्रेम कसे काय निर्माण झाले असा प्रश्नदेखील मला पडला आहे. त्याबद्दल तुम्ही मला काही सांगू शकाल काय?

उत्तर: त्याचे असे झाले, १९६३ ते ६८ या कालावधीत मी अमेरिकेत कॅलिफोर्निया येथे पोस्ट डॉक्टर फेलो म्हणून काम करीत होतो. माझे तेथील काम संपल्यानंतर मला स्वित्झर्लंडला परत जायचे होते. तसे पाहता अमेरिकेतून स्वित्झर्लंडला जाणे सोपे आहे. मी अमेरिकेच्या पश्चिम टोकाला होतो. म्हणून मी आशिया खंडावरून जायचे ठरविले. त्यावेळेस मी भारतात काही दिवस राहिलो. येथील कलाकृती पाहून मी भारावून गेलो. विशेषत: येथील रंगीत चित्रांनी तर मला भुरळच पाडली. त्याचबरोबर बौद्ध धर्माच्या शिकवणीने मला आकर्षित केले. तेव्हापासून संधी मिळेल तेव्हा मी भारत आणि तिबेट मध्ये येत असतो.

प्रश्न: आशिया विज्ञान शिबिरातील आपल्या एका व्याख्यानाचा विषय आहे 'आशियातील चित्रे'. हा विषय वाचून मी तर बुचकळ्यातच पडलो होतो. आता मात्र सगळं स्पष्ट झालं आहे. या चित्रात आपल्याला नेमकं काय आवडलं?

उत्तर: मध्य आशियातील चित्रकला अतिशय समृद्ध आहे. त्यांतील सौंदर्य, त्यांतून दिलेला संदेश आणि चित्रांसाठी वापरलेले रंग हे सगळेच अभ्यासाचे चांगले विषय आहेत.

प्रश्न: मध्य आशियातील प्राचीन चित्रांत बऱ्याचदा वनस्पतींचे किंवा धातू क्षाराचे रंग वापरले आहेत. म्हणूनच ते टिकाऊ आहेत. या रंगद्रव्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने आपण काही प्रयत्न केले आहेत काय?

उत्तर: नक्कीच. तुमच्याच भारतात चंद्रशेखर व्यंकट रामन नावाचा थोर शास्त्रज्ञ होऊन गेला. त्याने रामन परिणाम जगाला दिला. या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी रामन स्पेक्ट्रस्कॉपी (Raman Spectroscopy) नावाची एक वेगळीच उपशाखा भौतिकशास्त्रात उदयाला आली. त्या शाखेचाच उपयोग करून चित्रातील रंगद्रव्याचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

प्रश्न: आपण या वयातदेखील संशोधनाचाच विचार करीत आहात हे पाहून मला अतिशय आनंद झाला. संशोधनाची बीजे तुमच्यात लहानपणापासूनच रोवली गेली असे तुम्हाला वाटते काय?

उत्तर: अगदी लहान असताना मी माझ्या वयाच्या इतर मुलांच्या मानाने मागेच पडलेलो होतो. माझे आईवडील सांगायचे की, वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत मला नीट बोलता येत नसे. माझे तोतरे बोलणे फक्त माझ्या बहिणीलाच समजायचे. तीच माझी त्यावेळची इंटरप्रिटर (Interpreter) होती.

प्रश्न: मग तुम्हांला विज्ञानात आवड कधी निर्माण झाली?

उत्तर: मी साधारणपणे माध्यमिक शाळेत असताना मला विज्ञानात आवड निर्माण झाली. माझे वडील एका शाळेत शिकवीत असत. त्यांच्या संग्रही काही पुस्तके होती. त्यांतील एक पुस्तक वाचून त्यात सांगितलेले प्रयोग मी घरात असलेल्या वस्तूंच्या मदतीने करून पाहात असे. कधी या प्रयोगातून धूर निघायचा तर कधी स्फोट व्हायचा. त्यामुळे मला आईवडीलांची बोलणी खायला लागायची. परंतु हे करतानाच मला रसायनशास्त्रात गोडी वाटू लागली आणि याच शास्त्राचा आपण अभ्यास करायचा असे मी मनात ठरवून टाकले.

प्रश्न: आपल्या बालपणीचा अनुभव फारच बोलका आहे. बालपणातील अनुभव आपल्या जीवनाला दिशा देतात असे मी ऐकले होते. तुमच्या बाबतीत तर ते तंतोतंत लागू पडते. या अनुभवावर आधारित काही सूचना तुम्ही पालकांना देऊ इच्छिता काय?

उत्तर: मी पालकांना असे सांगू इच्छितो की मुलांना खूप खेळू द्या. त्यांना अनेक कृती करू द्या. प्रयोग किंवा प्रकल्प करायला त्यांना प्रोत्साहन द्या. यातून त्यांच्या मनात कुतूहल निर्माण होईल. ते कुतूहल शमविण्यासाठी ते वाचन करतील किंवा एखाद्या माहितगार व्यक्तीला प्रश्न विचारतील. अशा प्रकारे त्यांच्या ज्ञानात भर पडत जाईल.

प्रश्न: मी स्वत: विज्ञान शिक्षणात काम करतो. आम्ही देखील प्रयोगातून शिकवा असे ओरडून सांगत असतो. पण शिक्षक मात्र व्याख्यानाचा आधार घेतात. हे कितपत योग्य आहे?

उत्तर: हे योग्य नाही. भाषण ऐकून ज्ञान वाढत नाही. विद्यार्थ्यांना एका वर्गात डांबून ठेवणे आणि एकानंतर एक व्याख्यान देणे हे संपूर्णतया चुकीचे आहे. विद्यार्थ्यांना आधी अनुभव घेऊ द्या. त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे द्या. या पद्धतीने त्यांचे शिक्षण चांगले होईल आणि मिळालेले ज्ञान त्यांच्या लक्षात राहील.

प्रश्न: तुमच्या बोलण्यावरून मनुष्याच्या कुतूहल वृत्तीला तुम्ही बरेच महत्व देता असे दिसते. याखेरीज कोणती बाब तुम्हांला महत्त्वाची वाटते?

उत्तर: कुतूहल तर महत्वाचे आहेच. त्याचबरोबर नवनिर्मितीक्षमता (Creativity) देखील महत्त्वाची आहे. लहान मुलांमध्ये या दोन्ही बाबी प्रभावी असतात. शिक्षणाने आम्ही त्या बोथट करतो. खरे तर मुलांसारखी कुतूहल वृत्ती आणि नवनिर्मितीची उर्मी ज्यांच्यामध्ये असते तेच संशोधन करू शकतात किंवा नवीन कलाकृती निर्माण करू शकतात.

प्रश्न: याचा अर्थ असा की, कुतूहल वृत्ती आणि नवनिर्मितीक्षमता ही दोन्हीही कौशल्ये कमी न होता वाढतील असेच शिक्षण आपण भावी पिढीला दिले पाहिजे. आपण जे काम केले, त्यात या दोन्ही बाबींचा अंतर्भाव झालेला दिसतो. आपल्या ज्या संशोधनाला नोबेल पारितोषिक मिळाले त्याबद्दल आपण काही सांगू शकाल काय?

उत्तर: जरूर. मी न्यूक्लिअर मॅग्नेटिक रेझोनन्स या क्षेत्रात काम केले. माझे काम सैद्धांतिक स्वरूपाचे नसून प्रयोगिक स्वरूपाचे होते. खरे तर मी मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग मिळविता येईल असे उपकरण आधी बनविले.

प्रश्न: आपण तर रसायनशास्त्र घेऊन पदवी मिळविली होती. उपकरण बनविण्यासाठी या विषयाचे ज्ञान निश्चितच अपुरे होते. त्यासाठी तुम्हांला बराच अभ्यास करावा लागला असेल?

उत्तर: हो तर ! उपकरण बनविण्यासाठी मला इलेक्ट्रॉनिक्स शिकावे लागले. त्यासाठी मी अनेक पुस्तके वाचली. या विषयावरची व्याख्याने ऐकली आणि या क्षेत्रात असलेल्या माहितगारांशी चर्चा केली. या कामात माझ्या मार्गदर्शकाचा मला खूप उपयोग झाला. त्यांना उपकरणे बनविण्याचा आणि हाताळण्याचा खूपच अनुभव होता. खरे तर त्यांना याच बाबींचा अनुभव होता. सैद्धांतिक माहिती त्यांना तुटपुंजीच होती.

प्रश्न: म्हणजे काय? ते विद्यापीठात प्राध्यापक असतील ना? सैद्धांतिक बाजू पक्की असल्याशिवाय कोणी प्राध्यापक होतं का?

उत्तर: तेथेच तर खरी मेख आहे. माझे मार्गदर्शक जेमतेम मॅट्रिक पास झाले होते. त्यानंतर त्यांनी इन्स्ट्रुमेंटेशन (Instumentation) मध्ये डिप्लोमा मिळविला. त्या आधारावर उपकरणांची देखभाल करण्यासाठी म्हणून ते विद्यापीठात नोकरीला लागले. त्यांच्या कर्तबगारीनेते पुढे ते प्राध्यापक पदापर्यंत पोहोचले.

प्रश्न: आपल्या मार्गदर्शकाची गोष्ट तर हुबेहुब मायकेल फॅरेडे सारखी आहे. अल्प शिक्षण असताना-देखील स्वप्रयत्नाने ते मोठ्या पदावर पोहोचले. माणसाने

ठरविले तर काहीच अशक्य नाही, असेच आपल्याला म्हणायचे आहे काय?

उत्तर: होय, मला असेच म्हणायचे आहे. स्वप्रयत्नाने काहीही साध्य करता येते. त्याचबरोबर मला असेही सांगायचे आहे की व्यक्तीने हे माझे क्षेत्र आहे; यापलीकडे मी काही वाचणार नाही म्हणून चालत नाही. माणसाचे वाचन कसे चौफेर असावे. एखाद्या विषयाचे ज्ञान आपल्या कामाला आवश्यक आहे असे वाटत असेल, तर ते मिळवावे. दुसऱ्यावर अवलंबून राहू नये.

प्रश्न: ''जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला'' असा एक वाक्प्रचार आमच्या भाषेत आहे. आपले म्हणणे या वाक्प्रचाराशी मिळते जुळतेच आहे. आवश्यक ते ज्ञान आणि कौशल्य मिळवून आपण एनएमआर स्पेक्ट्रोमीटर बनविले. आपल्या या कामाला जागतिक प्रसिद्धी मिळेल असे वाटले होत का?

उत्तर: मुळीच नाही. खरे तर मला जेव्हा कळले की माझी नोबेल पारितोषिकासाठी निवड झाली तेव्हा मला आश्चर्यच वाटले. तेव्हा मी विमानात होतो. मॉस्कोवरुन न्यूयार्कला जात होतो. विमानाच्या कॅप्टनने मला येऊन ही बातमी दिली.

प्रश्न: हवेत नोबेल परितोषिकाची माहिती मिळण्याची ही बहुतेक एकमेव घटना असावी. कॅप्टनला-देखील आनंद झाला असावा?

उत्तर: केवळ कॅप्टनलाच नव्हे, तर विमानाच्या सर्व सेवकांना आनंद झाला. सगळ्या एअर होस्टेसनी एकत्र येऊन माझ्याबरोबर फोटो देखील काढून घेतला. कॅप्टनने विमानातूनच स्टॉकहोममधल्या अधिकाऱ्याशी माझी बोलण्याची व्यवस्था केली. हे सगळे सहज पार पडले. पण अडचण झाली ती पत्रकारांची. त्यांना माझ्या संशोधनाबद्दल माहिती पाहिजे होती. अनेकांनी आमच्या घरी फोन करून माझ्या बायकोला भंडावून सोडले.

प्रश्न: मग ही समस्या तुम्ही कशी सोडविली?

उत्तर: मी बायकोलाच सांगून टाकले तुला जे माहीत आहे ते सांग. तेवढी माहिती पत्रकारांना पुरेशी आहे. माझ्या बायकोने ते काम चांगल्या तऱ्हेने केले. मला वाटत होते तिला माझ्या संशोधनाबद्दल फारशी माहिती नसावी. पण वर्तमानपत्रातील मजकुरावरून तिने पुरेशी माहिती दिल्याचे माझ्या नंतर लक्षात आले.

प्रश्न: आपल्याला नोबेल पारितोषिक मिळाले, मानमरातब मिळाला; असा मानमरातब मिळवा असे ध्येय आपण मनाशी बाळगले होते काय?

उत्तर: नाही. आपण समाजासाठी काहीतरी उपयुक्त काम करावे एवढेच माझे ध्येय होते. समाजासाठी काम केल्याने समाज आपल्याला मान देतो. त्याने आपला स्वाभिमान बळावतो असे मला वाटते.

प्रश्न: जीवनाकडे मागे वळून बघताना आपल्याला काय वाटते?

उत्तर: जीवनाकडे वळून बघताना असे वाटते की मी समाधानाचे जीवन जगलो आहे. मला जर पुनर्जन्म मिळालाच तर मला परत असेच जीवन जगायला आवडेल. काहीतरी नवीन करायला आवडेल.

प्रश्न: काहीतरी नवीन करायचे असेल तर कोणत्या बाबींची गरज आहे?

उत्तर: काहीही नवीन करावयाचे असेल तर आपल्याला त्या विषयाचे सखोल ज्ञान आवश्यक आहे. त्याचबरोबर जिद्द आवश्यक आहे. ज्ञान आणि जिद्द हे तर आपले दोन पाय आहेत. या दोन पायांवर आपण उभे राहिलो तरच स्थिर राहू शकू.

<u>प्रश्न</u>: आपण तत्त्वज्ञासारखे बोलायला लागला आहात. धार्मिक तत्त्वज्ञानाचा आपल्यावर काही परिणाम झाला आहे काय?

<u>उत्तर</u>: खऱ्या अर्थाने मी धार्मिक माणूस नाही. परंतु बौद्ध धर्माच्या शिकवणीचा माझ्यावर चांगलाच प्रभाव पडलेला आहे. त्याचाच प्रसार आणि प्रचार मी आजकाल करीत असतो.

<u>प्रश्न</u>: आपल्याशी चर्चा करून अनेक नवीन गोष्टी कळल्या. भावी पिढीला आपण काही संदेश देऊ इच्छिता काय?

<u>उत्तर</u>: भावी पिढीला माझे एवढेच सांगणे आहे जे काही कराल ते मन लावून करा. बक्षीस मिळेल, पैसा मिळेल यासाठी करू नका. कामात जीव ओता. यश आपल्या दाराशी स्वत:हून चालून येईल. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विकास करा. आपल्या व्यवसायखेरीज दुसऱ्या कोणत्यातरी कामात आपले मन लावा.

<u>प्रश्न</u>: विज्ञानाखेरीज कोणत्या गोष्टीत आपण रमता?

<u>उत्तर</u>: मी मघाशीच सांगितले की मध्य आशियातील पेंटिंग ही माझी आवड आहे. ती जोपासणे, त्यांचा अभ्यास करणे याचा मला छंद आहे. मी आता ७७ वर्षाचा आहे. परंतु माझ्या घरात टेलिव्हिजन नाही. टीव्ही पाहणे हा वेळेचा अपव्य आहे असे मला वाटते. जग पाहायचे असेल तर आपल्या डोळ्यांनी पाहा, टीव्हीच्या कॅमेऱ्याने नको.

<u>प्रश्न</u>: तुमच्या घरात टेलिव्हिजन नाही हे ऐकून मला आश्चर्यच वाटते. टेलिव्हिजन शिवाय तुम्ही आपला वेळ घालवता कसा?

<u>उत्तर</u>: वेळ घालवायला मोकळा वेळ आहेच कुठे? मी तिबेटमधून काही चित्रे विकत घेतली आहेत. वर्षानुवर्षे तशीच राहिल्यामुळे त्यांचे रंग फिके झाले आहेत. नेमका कोणता रंग पुसट झाला याचा अभ्यास करून मी चित्र पुन्हा रंगविण्याचा प्रयत्न करीत असतो. यामध्ये माझा खूप वेळ जातो. मी आतापर्यंत अशी अनेक चित्रे रंगविली आहेत.

<u>प्रश्न</u>: याचा अर्थ छंद जोपासणे ही चांगली गोष्ट आहे. आपल्याला एखादा छंद असला की आपला वेळ कसा जातो हेच कळत नाही. असेच ना?

<u>उत्तर</u>: होय. प्रत्येक व्यक्तीने एकतरी छंद जोपासला पाहिजे. त्या छंदाचा संबंध आपल्या व्यवसायाशी असलाच पाहिजे असे नाही. विरंगुळा म्हणून या छंदाचा चांगला उपयोग होतो.

<u>प्रश्न</u>: आपण एक शास्त्रज्ञाचे जीवन जगला आहात. संशोधक म्हणून आपली ख्याती झाली आहे. या आधारे तुम्ही तरुण शास्त्रज्ञांना काय सल्ला देऊ इच्छिता?

<u>उत्तर</u>: तरुण शास्त्रज्ञांना मी असे सांगू इच्छितो की त्यांनी संशोधनाच्या क्षेत्रात धोका पत्करायला शिकले पाहिजे. ज्या विषयात बरेच संशोधन झाले त्यात नवीन करण्यासारखे फारसे काहीच नसते. म्हणून जे क्षेत्र नवीन आहे, अशावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. असे करण्यात असा धोका आहे की, आपण फारसे काही करू शकणार नाही. याउलट झालेच तर अगदी महत्वपूर्ण शोध लावू शकाल. म्हणून धाडस करा, धोका पत्करा.

<u>प्रश्न</u>: मला विश्वास आहे आपला हा सल्ला तरुण संशोधक जरूर लक्षात ठेवतील. याखेरीज तुम्ही आणखी काय सांगू इच्छिता?

<u>उत्तर</u>: मी असे सांगू इच्छितो की शक्य झाल्यास संशोधकाने एखादी प्रक्रिया किंवा उपकरण विकसित करावे. त्याने पुढील संशोधनकांना कार्य करायला संधी मिळेल.

---

केवळ पुस्तके वाचून ढीगभर ज्ञान साठवणे म्हणजे विद्या नव्हे, ते ज्ञान जीवनात उतरविणे म्हणजे विद्या.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

हाय रिझोल्युशन एनएमआर उपकरण (High Resolution NMR Instrument) मी बनविले. त्याच्या आधारे अनेकांनी महत्त्वपूर्ण शोध लावले. मी फक्त रेणूरचनेचाच विचार करीत होतो. पुढील संशोधकांनी त्याचा वैद्यकशास्त्रात कसा उपयोग करता येईल, असा विचार केला. त्यांना यश आले. सध्या मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग ही वैद्यकशास्त्रातील नावाजलेली पद्धत आहे.

एका प्रथितयश शास्त्रज्ञाशी गप्पा मारण्याचा अनुभव काही वेगळाच असतो. तो आनंद मी घेतला. मी विचारलेल्या सर्व प्रश्नांना त्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. त्यांच्या वागण्यातला साधेपणा लक्षात राहील असाच होता. त्यांच्या बोलण्यातून अनेक महत्त्वाच्या बाबी स्पष्ट झाल्या. महाराष्ट्रातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना ही सविस्तर मुलाखत उपयुक्त वाटेल अशी मला आशा आहे.

– डॉ. सुधाकर आगरकर
होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र,
मानखुर्द, मुंबई

●●●



## विशेष अभिनंदन
## महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या अध्यक्षपदी श्री. विलास सांगुर्डेकर यांची बिनविरोध निवड.



ठाणे जिल्हा मुद्रक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. विलास सांगुर्डेकर यांची नाशिक जिल्हा मुद्रक संघाने आयोजित केलेल्या महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या कार्यकारिणीत आगामी वर्षासाठी अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. विलास सांगुर्डेकर यांनी आपल्या व्यावसायिक व संघटन कौशल्याचा मेळ घालत व्यवसायाची २७ वर्षे पूर्ण केली आहेत. व्ही. पी. एम. दिशाचे ते मुद्रक आहेत.

महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या कामात गेली २० वर्षे त्यांचा सक्रिय सहभाग आहे. परिषदेच्या सरचिटणीस व कोषाध्यक्ष या महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केलेले आहे. महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रकाशित केलेल्या 'मुद्रा' या परिषदेच्या मुखपत्राचे अत्यंत कल्पकतेने संपादन केले. मुद्रण परिषदेच्या महाराष्ट्र व बेळगाव येथील मुद्रकांकरिता आयोजित करण्यात येणाऱ्या मुद्रण स्पर्धेचे गेली ३ वर्षे सातत्याने यशस्वी संयोजन करीत आहेत.

जिल्हा पातळीवर काम करीत असताना ठाणे जिल्हा मुद्रक संघाचे ते अध्यक्ष होते. ठाणे येथे झालेल्या महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या ४८व्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

मुद्रण व्यवसायातील बदलत्या तंत्रज्ञानाचे नवे प्रवाह स्वीकारल्याशिवाय मुद्रण व्यवसायाची प्रगती होऊच शकत नाही, हे जाणून मुद्रकांसाठी ज्ञानार्जन मेळावे आयोजित करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पनवेल येथील परिषदेच्या तंत्रशिक्षण व संशोधन संस्थेच्या अभ्यास कामात सक्रिय असे योगदान देत आहेत.

मानसिक धैर्य हा गुण, मन आणि बुद्धी या दोघांच्या साहाय्याने उत्पन्न होतो. – लोकमान्य टिळक

# श्री गणपती अथर्वशीर्ष

*माघी गणेश जयंती त्या निमित्ताने अथर्वशीर्षा संदर्भातील हा लेख देत आहोत - संपादक*

**ब्रह्मविद्या :**

अथर्वण हा एक वेद आहे. या वेदाबद्दल विशेष माहिती करून घेतली जात नाही. या वेदाबद्दल अनेक गैर समजुती आहेत. तो जादुटोणा, यातुधान या संबंधी विचार करणारा वेद आहे असा समज करून दिला गेला आहे. वास्तविक अथर्ववेद हा ब्रह्मवेद आहे. या वेदात ब्रह्मज्ञान सांगण्यात आलेले आहे. थर्वति: गति कर्मा तत् प्रतिषेध: निपात: निरुक्त। थर्व याचा अर्थ चंचल होणे, अस्थिरता, या वृत्तीचा रोध म्हणजे अथर्व. योग: चित्तवृत्ति निरोध:। पातंजल सू २ हे जे योगाचे लक्षण आहे त्याच अर्थी अथर्वा शब्दाचा स्पष्ट आशय आहे. अगर हाच त्याचा मुख्य विषय असल्यामुळे याला ब्रह्मवेद असे म्हणतात. याच वेदात प्रखरपणे ब्रह्मविद्या सांगितलेली आहे. ब्रह्मविद्या अगर आत्मविद्या अथवा अध्यात्म विद्या हा अथर्ववेदाचा प्रतिपाद्य विषय आहे. मन:संयम, मनाचे स्थिरीकरण प्राण सामर्थ्य हे विषय या वेदात आहेत. काहींना हा वेद जादू टोण्याचा वाटतो. मानसिक शास्त्राचा भाग यात आहे ही गोष्ट खरी. परंतु चित्तवृत्ति निरोध आणि ब्रह्मविद्या या वेदात प्रामुख्याने आढळते. याच स्वरूपाचे अथर्वशीर्ष हे सूक्त आहे. अशी अनेक सूक्ते या वेदात आहेत. उपनिषदातील तत्त्वज्ञान या अथर्वशीर्षात आहे. थोडक्यात, अथर्वशीर्ष म्हणजे डोके अगर मन शांत ठेवण्याचे शास्त्र होय.

**<u>अथर्वशीर्ष - यातील विषय व तत्त्वज्ञान</u>**

१) एकच सत्य तत्त्व आहे. तेच विश्वाची धारणा करते, विश्वनिर्मिती, धरण, पोषण, वलय, त्याचेच रूप.

२) सर्व काही तेच एक तत्त्व आहे. हेच सत्य व खरे तत्त्वज्ञान होय.

३) सर्व बाजूंनी संरक्षण करण्यास तेच तत्त्व समर्थ आहे.

४) वाणी, जीवन, आनंद ही त्याचीच रूपे

५) पंचमहाभूते ही त्याचीच रूपे

६) सर्व देवतांतून तेच प्रगट होते. गुण, अवस्था, काळ, शक्ती यांच्या पलीकडे तेच तत्त्व.

७) गँ गणपतये नम: हे गणेश बीजमंत्र व विद्या, याचे ऋषिगणक छंद - निचृद् गायत्री

८) या दमन करणाऱ्या शक्तीला जाणू या, अमंगलाचे नाश करणाऱ्या देवाचे ध्यान करू या, तो आमच्या बुद्धीला चांगली प्रेरणा देईल.

९) सृष्टीच्या पूर्वीपासूनच हे आदितत्त्व आहे.

१०) समूहांचे पालन पोषण करणाऱ्या देवतेला आमचा नमस्कार असो.

विषय - गणपतीचे आधिदैविक स्वरूप, सत्य कथन, रक्षणासाठी प्रार्थना गणपतीचे अध्यात्मिक स्वरूप, गणपतीचे स्वरूप, गणेश गायत्री, गणेशध्यान, नमन व फलश्रुति - शान्तिमन्त्र

**माणसाचे डोके शांत का राहत नाही :**

जीवनात दु:खे येतात, कष्ट झेलावे लागतात, विघ्ने येतात, मोह होतो त्यांतून शोक निर्माण होतो इत्यादी कारणांमुळे माणूस अस्वस्थ असतो.

द्वैत भावनेने व्यवहार होत असल्याने वरील गोष्टींचा नित्य अनुभव येतो. द्वैत भावना म्हणजे मी निराळा, जग निराळे. जग माझ्या उपभोगासाठीच असल्याने मी येथेच उपभोग घेईन, स्वैर वर्तन करीन, सगळी सुख साधने जवळ

करीन व सुखी होईन. द्वैत भावनेमुळे अशा प्रकारचे वेगळेपणाचे तत्वज्ञान स्वीकारले जाते. थोडक्यात, दुहीच्या पायावर सारा व्यवहार संभवतो. एक दुसऱ्यावर कुरघोडी, त्यातून स्वतःचे सुख साधणे सशक्तांनी अशक्तांची गळचेपी करणे, अशाने द्वैती तत्त्वज्ञान जगात सुख निर्माण करणार नाही. हे तत्त्वज्ञान भेद-भावावर उभे आहे. दुसऱ्यासाठी नमते घ्यावे या विचाराला या तत्त्वज्ञानात काहीच स्थान नाही. सतत भीतीच्या छायेत वावरावे लागते. या भीतीने मानव सतत अस्वस्थ, अशांत, असमाधानी राहतो.

द्वैत म्हणजे भांडण. द्वैत नाहीसे झाल्याशिवाय भांडण नाहीसे होणार नाही. द्वैत नाहीसे झाले पाहिजे, म्हणजेच समाधान व शान्ति स्थापित होईल. मी व तू यात वास्तविक भेद नाही दोनही मिळून एकच. दुसऱ्यास लुटणे, लुबाडणे, त्रास देणे म्हणजे स्वतःलाच लुबाडण्यासारखे व त्रास देण्यासारखे होईल. सर्व भेद वर वरचे. जीवन अखंड आहे. सर्व विश्व हे एकच जीवन त्यात विभिन्न असे काही नाही. जो परस्पर भेदभाव पाहतो सर्वांशी शत्रुत्वाचे आचरण करतो. तो चुकीचे आचरण करीत असतो. सर्व विश्व मी आहे. माझ्याशिवाय दुसरे काहीच नाही. या एकात्म प्रत्ययातून व्यवहार झाला पाहिजे. सर्वदा समबुद्धी ठेवून व्यवहार करता आला पाहिजे. असे झाले असता, सर्वत्र शांतता अनुभवता येईल.

विषम बुद्धीच्या व्यवहारातून हे दुःखाचे डोंगर सदा सर्वदा आपणसर्वांवर कोसळत आहेत. इथे समत्व बुद्धि, अभेद बुद्धी ठेवणे आवश्यक आहे. सर्व ठिकाणी मीच आहे. एकच तत्त्व सर्वत्र आहे हा दृष्टिकोण उत्पन्न करणे हाच यावर उपाय आहे. सर्वत्र अशा प्रकारची धारणा होण्यास आत्मिक शिक्षण दिले गेले पाहिजे. तरच सर्वत्र शांतता नांदेल व मनुष्याच्या जीवनात पूर्ण समाधान लाभेल. गणपती अथर्वशीर्षाने हे ध्येय आपल्यासमोर ठेवले आहे. या ध्येयामुळे आपल्या सर्वांचे दृष्टिकोण बदलावेत व सर्व व्यवहार निर्दोष व्हावेत अशी अपेक्षा आहे.

**गाणपत्यांचे कर्तव्य:**

या तत्वज्ञानाचा सर्व विश्वात प्रसार करून वैयक्तिक, सामाजिक, व जागतिक शान्ति प्रस्तापित होईल असे पहावे. गाणपत्यांचे हे प्रमुख कर्तव्य ठरते. याचा विपरीत व्यवहार करणे अयोग्य ठरेल. गणपतीने आपल्या अवतारात हेच केले. त्याचाच प्रसार करावयास गाणपत्य पुढे आले पाहिजेत. हे तत्त्वज्ञान मूलगामी असल्याने सर्वत्र समाधान व शांतता नांदेल व मानव खरी शान्ती अनुभवले. या तत्त्वज्ञानाचा जन्म यासाठीच झालेला आहे. हेच तत्त्वज्ञान वेद, उपनिषद्, गीता या ग्रंथातून ही सांगण्यात आलेले आहे. या गोष्टीचा विचार होणे अगत्याचे आहे. हेच गणपती अथर्व शीर्षाचे ध्येय आहे.

**रचना काळ :**

अनेन गणपति अभिषिंचति - मूर्तीवर अभिषेक करण्याचा उल्लेख आहे. म्हणजे मूर्ती पूजा सुरु झाल्यावर हे अथर्वशीर्ष झाले असले पाहिजे, असे म्हणता येईल. वैदिककाळी मूर्तीची रथातून मिरवणूक काढीत, मूर्ती मूल्याबद्दलही उल्लेख आहे. चतुर्थीचा उल्लेख त्याचा संबंध तुरीय अवस्थेशी मांडुक्य उपनिषद् काळापासून शिवसुत - शंकराचा पुत्र पुराणकाळ.

गणपती याचा अर्थ - स्वामी, अधीश्वर विश्वातील पदार्थ गणात वाटले गेले आहेत. उदा. पक्षिगण, मनुष्यगण, वृक्षगण, राक्षसगण इत्यादी. या सर्व गणांचा जो एकच अधीश्वर. त्यालाच गणपती म्हणावे.

तत्त्व, ब्रह्म, आत्मा हे शब्द समानअर्थी. त्वं प्रत्यक्षं तत्वंअसि। त्वं सर्वं ब्रह्मासि। त्वं साक्षात् आत्मा असि थोडक्यात, सर्वच गणेशतत्वानी व्याप्त. आपण सारे तेच आहोत. आपले शरीर आणि अवयव जसे अंगांगी भावाचे तसेच हे आहे. सर्व अवयव शरीराच्या हितासाठी स्वतःला अर्पण करतात, तसेच विश्वहितासाठी आत्मार्पण हीच गणेशपूजा.

**विश्वरूपी, विश्वात्म गणपती :**

त्याचे अध्यात्मिक स्वरूप वाङमय, चिन्मय, आनंदमय, मानवाची पूर्तता या अनुभवाने होणार आहे. वाणी, जीवन आणि आनंद यांतील दैवी शक्तीचा अनुभव करणे हे एक मोठे व्रत आहे. त्या दैवीच ठेवणे त्याना आसुरी करू न देणे हेच महान व्रत होय. आपली सारी शक्ती त्या विश्वरूपी गणपतीचे स्वरूप होय.

तो सच्चिदानंदात् द्वितीय - सत् - अस्तित्व, चित् जीवन वा ज्ञान, आनंद-अभौतिक सुखाचा अनुभव हे गणपतीचे स्वरूप गणपती आत्मा तर विश्व त्याचे शरीर, विश्वदर्शनाने विश्वात्म्याचा साक्षात्कार शक्य.

गणेश पुराणातील उल्लेख - त्रिपुरवध काळे शिव वाक्यम्।
शैवै त्वदीयै: उत वैष्णवैश्च शाक्तैश्च सौरै: अपि सर्व कार्ये।
शुभाशुभे लौकिक वैदिकश्च त्वं अर्चनीय: प्रथमं प्रयत्नात्॥

तुला सर्वप्रथम शैव, वैष्णव, सौर व शाक्त उपासक प्रयत्नपूर्वक भजतात. कार्यात कोणतेही विघ्ने निर्माण होऊ नयेत म्हणून प्रार्थना करतात. वेद काळापासून आजपावेतो सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यात ॐ या निर्गुण नामाचा उल्लेख करतात आणि पौराणिक काळापासून आजतागायत श्री गणेशाय नम: या सगुण रूपाचे शुभ नामस्मरण करतात.

**वैदिक काळ :**

गणानां त्वा गणपति हवामहे। गणेशाचे आवाहन केले जाते. निषुसीद गणपते - त्याला बसावयास आसन दिले जाते. आणि प्रार्थना केली जाते. न ऋते त्वत् क्रियते किंचनारे महामर्कम्। तुझ्यावाचून कोणतेही काम होत नाही असे म्हटले जाते. असा गणपती आहे तरी कोणा अशी जिज्ञासा होणे साहजिक आहे. ॐ हे निर्गुण रूप - असा गणपती सगळेच पूजतात. बुद्ध जैन आदी मंडळी देखील ॐ नम:सिद्धं, तसेच ॐ मणि पद्मे हूं असे म्हणतात. खिश्चन आमेन असा उच्चारव करतात.

केवळ अथर्वशीर्षाचे पारायण न करता गणपती परायण झाले पाहिजे. अथर्वशीर्षात सांगितलेल्या सिद्धांताचे मनन व्हावयास हवे. तेव्हा स्वयं गणेशच स्वत:बद्दलचे ज्ञान उघड करील. ज्ञानपूर्वक भक्ती या दोहोत महदंतर आहे. भक्तीने ज्ञान प्राप्त होते. ज्ञानयुक्त भक्तीने परम सुख व आनंद मिळतो. नुसते पठण ज्ञानयुक्त भक्ती. मात्र ज्ञान युक्त भक्तीने गणेश तत्त्वाचे रहस्य समजल्यामुळे ज्ञानोत्तर भक्तीचा अपूर्व आनंद प्राप्त होतो. हा शाश्वत सुख देणारा ठेवा आहे.

'श्री' याचा अर्थ य: श्रीयते-सेवते-स श्री: ईश्वर: म्हणून परमेश्वराला श्री असे म्हणतात. ये प्रकृत्यादय: जडा: जीवा: गण्यन्ते तेषां ईशा: स्वामि: पति:वा। परमेश्वर सर्व प्रकृत्यादिक पदार्थांचा व जीवमात्राचा पालक म्हणून तो गणेशवा गणपति ग् + अ = शक्तिरूप व सूर्यरूप ण् + अ = विष्णुरूप व शंकर रूप असा गण हा शब्द सिद्ध झाला. गणेश पुराणात असे म्हटले आहे. यस्मात् ॐकार संभूति: यतो वेदा यतो जगत्। येन सर्वमिदं व्याप्तं तं विद्धि गणनायकम्॥ गणनायकापासून ॐकार, वेद व जगाची उत्पत्ती झालेली आहे.

श्री गणेश हे परमात्म्याचे सगुण असे ब्रह्म स्वरूप आहे आणि जीवमात्राने सगुण- ब्रह्माची उपासना केल्याने ती तद्रूप होते. तसेच हे जीव व ब्रह्म ऐक्याचे स्पष्टीकरण करणारे पूर्णरूप आहे. सर्वांनाच भक्तिमार्गाने पूर्णतेकडे नेणारी ही गणेशदेवता आहे. अविद्या उपाधि चैतन्यं जीव:। विद्या उपधि चैतन्यं ईश्वर:। अ-नाही, अभाव असते, विद्या-जाणणे, ज्ञान उपाधि-पीडा. ज्याला पीडा जाणवत नाही अशा गोष्टीला विद्या म्हणतात.म्हणजे, हा आंतरिक भाग आहे. बाहेरील भाग हा अविद्येने व्याप्त आहे. जीव आणि ईश्वर उपाधिमुळे अलग वाटतात या भ्रांतीमुळे झालेल्या भेदाचा विलय करून अभेद स्वरूप परब्रह्म परमात्म्याच्या ज्ञानप्राप्तीसाठी श्री गणपती. अथर्वशीर्षाचे द्रष्टे गणक ऋषि यानी हे सांगितले. अथर्वण ऋषीने स्वत: हे अनुभवले. असे हे गणपती अथर्वशीर्ष आहे. उपाधीमुळे

जीव व ईश्वर याचा भेद ब्रह्यामधे कल्पिला जातो. वास्तविक जीव ब्रह्मच आहे. सगुण ब्रह्मच उपासना करण्यायोग्य आहे. निर्गुण ब्रह्म उपासनेसाठी अनुपयुक्त.

**शान्तिमन्त्र :**

ॐ सहनाववतु। सहनौभुवक्तु ।सहवीर्यं करवा वहै। तेजस्विनातधीतमसतु।

मा विद्विषावहे। ॐ शान्ति: शान्ति: शान्ति:

गुरू व शिष्य या उभयतांनी म्हणावयाचा हा शान्ति मंत्र आहे. ते उभयता म्हणतात. आपणा उभयतांचे रक्षण असते उभयता आपण उपभोग घेऊ. उभयता आपण पराक्रम करू. आपले अध्ययन तेजस्वी होवो. आपण परस्परानी प्रेममय वर्तन ठेवू या (निंदा इत्यादी न करणारे होऊ) त्रिवार शान्तीच्या उच्चारणाने वैयक्तिक शांति, सामाजिक शान्ति व वैश्विक शान्ति लाभो अशी प्रार्थना केली आहे.

विषयानुरूप अनुवाद व विवरण

**गणपतीचे आधिदैविक स्वरुप-**

ॐ नमस्ते गणपतये। त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि। त्वमेव केवलं कर्तासि। त्वमेव केवलं हर्तासि। त्वमेव सर्व खलु इदं ब्रह्मासि। त्वं साक्षात् आत्मासि नित्यं।

ॐकार रूपी गणपतीला वंदन असो. ॐइति एकाक्षरं ब्रह्म गणेशो वै ब्रह्म। एकाक्षरं पुनर्ब्रह्म नादयुक्तं अजायत। वैकारिकं पुनर् रूपं यदानंदमयं स्थितं। मायाविकार मासाद्य तदेवाभूत् गजानन। ॐ-अवति इति रक्षण करते ते. सर्व धर्मीय याचा उच्चार करतात. ॐ नम: सिद्धं। जैन. ॐ मणिपद्मे हुं। बौद्ध. आमेन-ख्रिस्तधर्मीय. हे अर्धमात्राचिन्ह मानतात. ज्ञानेश्वरीत - अकार चरण युगल। उकार उदर विशाल। मकार महामंडळ। मस्तकाकारे। हे तिन्ही एकवटले। तेथे शब्द ब्रह्म कवळले। ते मिया गुरूकृपे नमिले। आदिबीज।

ब्रह्मदेवाच्या मुखातून आठ लाख श्लोक संख्या असलेली पुराणे व्यक्त झाली. त्यातील व्यासानी द्वापार युगात अठरा पुराणे व अठरा उपपुराणे रचिली. अठरा महापुराणे - त्यातील पहिले पुराण ब्रह्म पुराण ते निर्गुण गणेश महात्म्याने युक्त. परमात्म प्रतिपादनाचे कारण शेवटचे पुराण ब्रह्मांडपुराण त्यामध्ये सगुण गणेशाचे वर्णन आहे. ॐकार स्वरूपाच्या प्रतिपादनाचे कारण स्वरूप. तसेच उपपुराणात पहिले उपपुराण गणेश पुराण त्यात गणेशाच्या सगुण निर्गुणतेचे महात्म्य वर्णन केले आहे. शेवटचे उपपुराण मुद्‌गल ते योगमय गणेशाच्या महात्म्याने युक्त आहे. थोडक्यात, या चार पुराणांतून गणेशाचे महात्म्य प्रगट झालेले आहे.

गणशब्द: समूहस्य वाचक: परिकीर्तित:। तेषां स्वामी गणेशान: तं ज्ञात्वा योगिन:पुरा।

शान्तिं प्राप्ता विशेषेण योगशान्तिमयं परम्।

त्वमेव प्रत्यक्षं तत्त्व मसि-त्वं पदं नरश्च तत् पदं गजश्च तयो: अभेदात्मक: गणेशदेह: प्रत्यक्ष ब्रह्मात्मकत्वं नर + गज या दोघांचा भेद तो अभिन्न आकृतिमय स्वरूपाचा आहे. त्वं पद नरात्मक म्हणजे प्रणवात्मक तत् पदाचा गजात्मक अर्थ - समाधिता योगिनो यत्र गच्छन्ति इति व्युत्पादयति स्मृति हिं गज शद्बम्। एष प्रतिपादयति कारणं परंब्रह्म। (गणेशतत्व सुधालहरी) 'ग' कार आणि 'ज' कार पदाचा अर्थ आधिलय मग निर्मिती असा उलट वाटतो. प्रथम योगी जनाना स्थानरूप दर्शन घडविले मग तत् स्वरूप दर्शनार्थ 'ज' कार याचाच सुलट भाग जग. गजाकार रूप ॐकार प्रतिपादक आहे तोच ॐकार जगन्मय आहे बिंब प्रतिबिंबवत् 'गज' शद्ब आहे असे नाव ब्रह्माचे आहे. गजवक्त्र- हत्तीचे मुख हत्तीच्या मुखासारखा ॐकार आहे. नर शद्बापासून त्वं पद आणि त्याचा अर्थ, गज शद्बापासून तत् पद आणि त्याचा अर्थ. या प्रमाणे नर गज यांचा अभेद तोच तत्त्वं याचा अभेदात्मक गणेश देह. तोच सगुण ब्रह्म ॐकार स्वरुप महागणयाते त्वं एव केवलं कर्तासि - तूच

एकटा या सृष्टीचा कर्ता आहेस ॐकार तत्वाची उत्पत्ती आहे. त्वं एव केवलं धर्तासि - तूच पालन करणारा आहेस. त्वं एव केवलं हर्तासि - तूच या सृष्टीचा लय करणारा आहेस. त्वं एव खलु इदं ब्रह्मासि - तूच खरोखर ब्रह्म आहेस. त्वं साक्षात् आत्मासि नित्यं - तू साक्षात् नित्य स्वरूप आत्मा आहेस

सत्य कथन-ऋतं वच्मि। सत्यंवच्मि।

या दोहोंचा मन आणि वाणीशी संबंध येतो. मनाला साक्ष ठेवून वाचिक सत्य तेच सांगतो - ऋत-सरळ, स्पष्ट, सत्य- अविनाशी वस्तू निसर्गात नियमितता, आणण्याचे काम ऋत करते. सत्य - अविकारी, अविनाशी वस्तुतत्व.

**रक्षणासाठी प्रार्थना :**

अवत्वंमाम्। अववक्तारम्। अवश्रोतारं। अवदातारम्। अवानूचानं अवशिष्यम्। अव पुरस्तात्। अवपश्चातात्। अवदक्षिणात। अवचोर्ध्वातात्। अवाधरातात्। सर्वतो मां पाहि समंतात्।

अवत्वं माम् - तू माझे रक्षण कर अव वक्तारम् - तुझ्या स्वरूपाचे वर्णन करणाऱ्या वाणीचे रक्षण कर. अव श्रोतारं - तुझ्या गुणांचे श्रवण करणाऱ्याचे रक्षण कर. अवदातारम् - तुझी उपासना अखंड चालू ठेवण्याची बुद्धी देणारा असा तू माझे रक्षण कर . अवधातारम् - उपासनेची बुद्धी देणारा जो तू माझ्या बुद्धीचे रक्षण कर, अवनू चानं अवशिष्यम् - तुझ्या शिष्याचे रक्षण कर. अवपश्चातात् माझ्या पूर्व कर्माच्या दोषापासून रक्षण कर. अव पुरसमत्- माझ्या भविष्य कालीन कमजोर विचारापासून रक्षण कर अवोत्तरातात् - उत्तर दिशेकडून माझे रक्षण कर. अवदक्षिणातात् - दक्षिण दिशेकडून माझे रक्षण कर. अवचोर्ध्वातात् - वरून अकस्मात येणारी नकळत उत्पन्न होणाऱ्या दोषापासून रक्षण कर. अवाधरातात्- अधर- भूमि-भूमि दोषापासून रक्षण कर. सर्व तो मां पाहिपाहि समंतात् - अवांतर व आसमंत भागाकडून माझे रक्षण कर. दिशाना काही विशिष्ट अर्थ आहे. पश्चिम पराक्रमाची - त्याचा अहंकार उत्पन्न होऊ नये. पूर्व - ही दिशा ब्रह्मज्ञानी यांची आहे. ती सत् बुद्धीची दिशा. यमाची. मृत्यूपासून रक्षण कर. ऊर्ध्वदिशा पितरांची अधर - आधार-भूमी

**गणपतीचे आध्यात्मिक स्वरूप -**

त्वं वाङ्मय त्वं चिन्मयः त्वं ब्रह्ममयः। त्वं सच्चिदानंदात् द्वितीयोऽसि। त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि।

त्व ज्ञानमयो विज्ञान मयोऽसि।

त्वं वाङ्मयः त्वं चिन्मयः - तू वाणी स्वरूपी, नामरूपी चैतन्यमर्या आहेस

त्वं आनंदमयः त्वं ब्रह्ममयः। त्वं सच्चिदानंदात् द्वितीयोऽसि। त्व प्रत्यक्षं ब्रह्मासि। - हाव्यस्थित प्रत्यक्ष ब्रह्म तूच आहेस. त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि - तू ज्ञाना आणि विज्ञाता पण आहेस.

**गणपतीचे स्वरूप :**

सर्व जगदिदं त्वत्तोजायते। सर्वं जगदिदं त्वत्तः तिष्ठति। सर्व जगदिदं त्वयि लयं एष्यति। सर्व जगदिदं प्रत्येति। त्वं भूमिरापोनलो निलो नभः। त्वंचत्वारिकवाक् पदानि। तूच सृष्टी निर्माता, रक्षणकर्ता व संहार कर्ता आहेस तुझ्या मुळेच सृष्टी अनुभवावयास येते, तू पंचमहाभूत आहेस. तू वाणीचे चार पाद आहेस. परा, पश्यंति मध्यमा वैखरी तूच आहेस.

त्वं गुणत्रयातीतः। त्वं कालत्रयातीतः। त्वं देहःत्रयातीतः। त्वंमूलाधार स्थितोऽसि नित्यं। त्वं शक्तिमयात्मकः। त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यं। त्वं ब्रह्मात्वं विष्णुःत्वंरुद्रः त्वं इंद्र त्वं अग्निः त्वं वायुः एवं सूर्यः त्वं चंद्रमाः त्वं ब्रह्म भूःभुवः स्वः ॐ।

तू सत्व रज तम या तीन गुणाच्या पलिकडे आहेस. तू वर्तमान भूतभविष्य काळाच्या पलीकडे आहेस स्थूल, सूक्ष्म, कारण देह याच्या पलीकडे तू आहेस. तू नित्य मूळाधारात वास करतोय (मूळाधाराचे दैवत श्री गणेश मानले

जाते) तू उत्पत्ति स्थिति लय या तीन शक्तीच्या पलीकडे आहेस. तुला नित्य योगिजन स्मरण करतात. तू ब्रह्म - सृष्टिकर्ता, विष्णु-पालन कर्ता, रुद्र-प्रलयकर्ता, इंद्र-ऐश्वर्याचा उपभोक्ता, अग्नि- विग्रहण करणारा, वायू-सर्व जीवनांना प्राण देणारा, सूर्य-सर्व प्रकाशक, सर्वज्ञाता, चंद्र-वनस्पतीचा जीवनदाता, ब्रह्म - सर्व प्राण्यांतील जीव, भू-पृथ्वी, भू-पृथ्वि, भुवः अंतरिक्ष स्वःस्वर्ग आणि ॐकार रूपी आहेस.

गणेश विद्येचे स्पष्टीकरण - 'ग'कार गण शब्दाचा आदिभूत म्हणून तो प्रथम, नंतर वर्ण म्हणजे ॐकाराचे आदिअक्षर 'अ' म्हणजे अकार व पुढे अनुस्वार - आद्य ग् कार पर अकार आणि परतर अनुस्वार, हा अनुस्वार अर्धचंद्रासारखा, सुभोभित आहे - थोडक्यात ग् + अ् + = गँ एकाक्षर मंत्र तारेण रुद्धं - तार - ॐकार. तारक मंत्राने युक्त म्हणजे ॐकाराच्या ॐच्चाराने एकाक्षर गणेश मंत्राचे स्वरूप आहे. आता हाच मंत्र वेगळ्या शब्दात पुनः सांगितलेला आहे.

ग कारः पूर्व रूपम्। अकारोमध्यम रूपम्। अनुस्वारः चान्त्यरूपम्। नादः संधानम्। संहिता संधिः एषा गणेश विद्या।

ग् कारः प्रथम अ कार मागाहून अनुस्वार त्यानंतर अनुनसिक हे बिन्दु स्वरूप आहे. नादः संधानं- ग् + अ + अनुस्वार + बिंदु या चार भिन्नवर्णांच्या एकीकरणाला संधान म्हणतात. तसा नाद उच्चारावा. त्याचमुळे ऐक्यभाव उच्चारणास समर्थ होतो. संहितासंधिः नादाने प्रेरित वर्ण आणि त्यासाठी होणारे ऐक्य त्याला संधि म्हणतात. हा मंत्र गणेशाची प्राप्ती करून देणारा आहे. याच मंत्राने देवी पार्वतीने श्री गणेश आराधना करून त्याला प्रसन्न करून घेतले व त्याचे प्रत्यक्ष दर्शन घेतले आणि तू माझा पुत्र हो अशी प्रार्थना केली. गणेशाने तिच्या उदरी जन्म घेतला. पुत्रप्राप्तिसाठी हा मंत्र जपावा.

**या मंत्राचे ऋषि देवता व छंद :**

गणक ऋषिः। निचृद् गायत्रीछन्दः। गणपतिः देवता। गँ गणपतये नमः। गणेशमंत्राचे द्रष्टे ऋषी गणक होत. छंद म्हणजे वृत्त निचृद् गायत्री - चोवीस पेक्षा कमी आधिक अक्षरे मंत्र देवता गणपति. मंत्र स्वरूप ॐ गँ - हा मंत्रोच्चार करून गणपतीला वंदन करावयाचे हा निर्गुण स्वरूपाचा गणपतीचा मंत्र होय. गणपतये हा पंचाक्षरी सगुण मंत्र आहे. तो कसा ब्रह्माचे स्वरूप बिंदुमात्र आहे ग् हे व्यंजन त्यात तत् स्वरूप सर्व प्रवर्तक विष्णू हा पालक अ म्हणजे 'ग' हे स्थित झाले. या दोघांचा संहार कर्ता शंकर तो अनुस्वार या सर्वांच्या आत्म्यात असणारा सर्व अनुनासिक रुपाने वास्तव्य करतो. आणि या चौघाना देहरूप करणारी शक्ती ॐ गँ या मत्राक्षराच्या आधी असते या सर्वांचा एक भाव त्याला वेदात गणेश म्हणतात. या मंत्रांवरून इतर सर्व मंत्रांची उत्पत्ती झाली. हा मंत्र ब्रह्मभूमत्व प्राप्त करून देणारा आहे. पुरश्चरण मार्गेण दशलक्ष जपस्च तम्। ततः प्रत्यक्षतां यास्ते दास्ते सामर्थ्यं उत्तम्।

**गणक ऋषि कोण ? :**

गुरुः ब्रह्मा गुरुः विष्णुः गुरुःदेवो महेश्वरः गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।

जगदीश्वर तेच जगताचे गुरू. श्री गणेश परब्रह्म गुरु त्याजपासून सर्व देवादिकांची उत्पत्ती तेही जगताला गुरु स्थानीच ते अंश रूपाने भृगु, शुक, व्यास, मुद्गल असे ओळखले जातात. अज्ञान दूर करण्याकरता प्रत्येक युगात आचार्यांचा एक मुख्य अवतार होतो त्याला मृगाचार्य म्हणतात. कृते गणकः प्रोक्तः त्रेतायां मुद्गलोमुनिः। द्वापरे भृगु व्यासौच कलौ श्री शंकरः स्मृतः।

**गणेश गायत्री :**

एक दन्ताय विघ्न हे वक्रतुण्डाय धीमहि। तन्नोदन्ती प्रचोदयात्। हा गणेश गायत्री मंत्र आहे. एक - अर्थ माया,

दन्त - सत्ता एकदन्त-मायार्धश त्याला जाणावे विघ्न हे. तो सगुण ब्रह्म आहे. मुद्गल पुराण- एक शब्दात्मिका माया तस्या: सर्व सद्भवम्। भ्रांतिलं मोहदं पूर्व नानाखेलात्मकं खिलम्। दन्त: सत्ताधर: तत्र माया चालक उच्यते। माया भ्रांतिमध्ये प्रोक्ता सत्ता चालक उच्यते। नयो: योगे गणेशोऽयं एकदन्त: प्रवर्तित:।

वक्रतुण्ड - हे जगत् मनवाणीमय आहे. त्याहून वक्र असे त्याचे मुख तो वक्रतुण्डपरमात्मा मनवाणी विरहित वक्र -माया, तुण्ड-ब्रह्म वक्रान्-विघ्नान् शत्रूत् वा तुंड्याति-नाशयति वक्रान् तुण्डयति इति वक्रतुण्ड:। मुद्गल पुराण विश्वात्मकं यस्य शरीरमेकं तस्मान्च वक्र परमात्मरूपम्।

तुण्डंत देव हि तयो प्रयोगे तं वक्रतुण्डं प्रणमामि नित्यम्। बिंब मायास्तुतं वक्तं मोहितं सिद्धिबुद्धिगम्। तत् भावं हन्ति तुण्डेन ते नायं वक्रतुण्डक:। भक्तानां विघ्न रूपाय वक्रास्ते कथिता सुरै:। तास्तंडेन हनिष्यामि वक्रतुण्डस्तत: स्मृत:।

**गणेशध्यान :**

एकदन्तं चतुर्हस्तं पाशमङ्कुश धारिणम् रदंच वरदं हस्तै: बिभ्राणं भूषकध्वजम्। रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्त वाससम्। रक्तगन्धानु लिप्ताङ्गं रक्तपुष्पै: सुपूजितम्। भक्तानुकम्पिनं देवं जगत् कारण मच्युतम्। अविर्भूतंच सृष्ट्यादौ प्रकृते: पुरुषात् परम्। एवं ध्यायन्ति नो नित्यं स योगी योगिनां वर:। रद-दात. उंदिर वाहन, सृष्टीच्या पूर्वी असलेल्या प्रकृति पुरुषाहून पलीकडचा म्हणजे दोन्ही सत्ता जगाच्या ठिकाणी नांदतात असा. एकदन्त - सत्तात्मक प्रकृती. सगुण ब्रह्म स्वर्गातील देवता मृत्युलोकातील मानव पाताळातील असुर आणि नाग या चार योनीतील लोकांना चालकत्वाच्या ठिकाणी वाटणारा म्हणून चतुर्भुज व त्या हातात पाश, अंकुश रद आणि वरद ही आयुधे धारण केली आहेत. मुद्गल पुराणातील वर्णन असे आहे.

पाशं मोहमयं तस्य स्वभक्तमोहनाशनम्। नियन्माख्य तथा ब्रह्म अंकुशश्च महात्मन:। दृष्ट नाशकरं ब्रह्म दन्त: सर्वादि नाशकृत्। वरं सकामिनांच काम्यं ब्रह्म तत् स्मृतत्। पाश - बंध जन्मादारभ्य मृत्युपर्यंत अनेक पाश-पीडा माणसाला छळत असतात त्यामुळे त्याचे डोके शांत राहत नाही. गणेश या साऱ्या पाशातून मुक्त करणारा आहे. तो पाशविमोचक आहे अंकुश - अंकयति इतिअंकुश, सर्व नियामक, नीतीने चांगल्या मार्गाने चालावे यासाठी योजलेले शस्त्र अंकुश म्हणजे नीती. ज्ञानेश्वर महाराज हाच अर्थ देतात. नीतिभेदु अंकुश हत्तीला बळाचा मद येतो. त्याला योग्य मार्गाने चालवण्यासाठी माहुताला अंकुशाचा वापर करावा लागतो. अहंकाराने मदोन्मत्त होऊन कोणाला न जुमानणारा माणूस होतो न्यायाचा, नीतीचा अंकुश, त्यापलिकडे परमेश्वराचे नियंत्रण आवश्यक भूषकध्वज - सर्वान्त र्यामी प्राणिमात्राच्या हृदयात स्थित असलेला. सर्व स्वरूप कृत भोगांचा भोक्ता. सर्व प्राणिमात्रांच्या अज्ञानाचा नाश करणारा. तरी पण सर्व जीवात्म्यांच्या पापपुण्यापासून राहित.

मुष स्तेये तथा धातु: ज्ञातव्य: स्तेत ब्रह्मधृक्। नामरूपात्मकं सर्व असत् ब्रह्म वर्तते।

अहंकार युतास्तं वै न जानन्ति विमोहिता:। वयं भोक्तार एवं ते मानयन्ति विशेषण:।

ईश्वर: सर्व भोक्ताच चोरवत् तत्र संस्थित: तदेव भूषक: प्रोक्तो मनुजानां प्रचालक:। मुद्गल पुराण मूषक म्हणून उंदिर गणपतीपुढे ठेवला जातो हा एक संकेत म्हणूनच वास्तविक उंदिराचा काही संबंध नाही. अंतर्यामी बसून सर्व करवितो व आपण नामा निराळ होतो. व्यापक सत्तेच्या निमित्ताने सर्वत्र गमनादि व्यवहार करणारा मूषक या अवतारात गणेशाने मायासुराचा वध केला. रक्तवर्ण- आदित्यवर्ण तमस: परस्तात असे ब्रह्माचे वर्णन आहे. सूर्यासारखा कांतिमान लंबोदर स्वत:च्या उदरात सर्वांना सामावून घेणारा तवोदर स्थितं सर्व येन लम्बोदर: स्मृत:।

तस्य उदरात् समुत्पन्नं नानाविश्वं न संशय: । नाना ब्रह्म तथेशश्च अन्ते तत्र स्थितोऽभवत् । सर्वेषांजनको माता तथा सर्व प्रदपिक: । तत्रकि संशयं विप्रा कुरुत ब्रह्मणस्पती । शूर्प सर्व नराणां वै योग्य भोजन कामाया । तथा माया विकारेण युक्त ब्रह्मन लभ्यते । त्यक्त्वा उपासनकं तस्य शूर्पकर्णस्य सुंदरी । शूर्प कर्णश्च वेदेषु कथिरोऽभवत् । तं भुजस्व विधानेन शान्ति युक्त भविष्यसि । भक्तानुकंर्न - भक्त वात्सल्य हा गणेशाचा गुण

**नमन :**

नमो व्रातपयते, नमो गणपतये, नम: प्रमथपतय नमस्तेऽस्तु लंबोदराय विघ्न नाशिने शिवसुताय श्री वरदमूर्तये नम: । नमो व्रातपतये - व्रत धारणकरणाऱ्या देव समुदायांचा पति नमो गणपतये - गण समूह वाचक पति नम: प्रथम पतये - प्रथम नावाचे शंकराचे योद्धे त्यांचा अधिपति ध्यानस्थं परिचर्यन्नि सलिलादिभि: ईश्वरम् । नाना शस्त्र धरा शंभो गणास्तु प्रमथा समृता: । प्रमथन्नित्रिच युद्देषु युद्धमानान् महाबलान् । ते वै महाबळा:गुरा: संख्याता: बसु कोट्य: । नमस्ते अस्तु लंबोदराय एकदन्ताय विघ्ननाशिते शिवसुताय - शिवपुत्र ध्यानेमनसि मेजान: पुत्रत्वं पालय प्रभो । मम पुत्र इति ख्यात: लोकेऽस्मिन् भगवन् भव । वरदमूर्तये नम: देव व जनांना वरदान देणारा श्री गणेश

एतत् अथर्वशीर्ष यो अधीते स ब्रह्मभूयाय कल्पते अथर्वशीर्ष अभ्यासणारा ब्रह्म रूपाला पोहोंचतो सर्व विघ्नै:न बाधते त्याला संकटे बाधत नाहीत सर्वत: सुख मेधते सर्वांपासून सुख प्राप्ती होते. सपंच महापापत प्रमुच्यते - हिंसा, अभक्ष्यभक्ष, परस्त्रीगमन, चोरी, व तत् सदृश पापाचरण ब्रह्महत्या सुरापान, भक्ती - द्रव्याच्या लोभाने मोहाने ही विद्या जो शिकवील तो अतिपापी होईल सहस्रा वर्तनात् - यं यं कामं अधीते तं तं अनेन साधयेत् - अनेन गणपतिं अभिषिच्यति । स वाग्मी भवति वाक् सिद्धि प्राप्त होतो. चतुर्थ्यां अनश्नत् गणति स विद्यावान् भवति - विनायकी वा संकष्टी या दिवशी अन्नपाणी वर्ज करून गणपतीला जो भजतो तो विद्यावान होतो. इति अथर्वणवाक्य - हे अथर्व ऋषींचे म्हणणे आहे. ब्रह्माद्यावरणं विद्यात्- न बिभेति कदाचनेति । आवरण म्हणजे माया

यो दुर्वाङ्कुरै: यजति । स वैश्रवणोपमोभवति । यो लाजै: यजति । स यशोवान् भवति । स मेधावान् भवति । यो मोदक सहस्रेण यजति । स वाञ्छित फलं अवाप्नोति । य: साज्य समिध्दि: यजति । स सर्व लभते स सर्वलभते ।

अष्टौ ब्राह्मणान् सम्यक् ग्राहकंत्वा । सूर्य वर्चस्वि भवति । सूर्यग्रह महानद्यां प्रतिमा सन्निधौ वा जप्त्वा सिद्ध मन्त्रोभवति । महाविघ्नात् प्रमुच्यते । महा पापात् प्रमुच्याते । महादोषात् प्रमुच्यते । स सर्वविद् भवति । स सर्वविद् भकी । य एवं वेद ।

जो दुर्वांनी हवन करतो तो कुबेरसम होतो. जो लाह्यांनी हवन करतो तो यश प्राप्त करतो व ज्ञानी होतो मोदक सहस्राचे हवन करणारा त्याला ईप्सित प्राप्त होते. तुपासह समिधा हवन करतो त्याला आठ ब्राह्मणांसह सूर्य ग्रहणाच्या वेळी महानदीत वा प्रतिमेच्या समोर जप करणारा - सूर्यासारखा तेजस्वी होतो. त्याचा मंत्र सिद्ध होतो. तो मोठ्या विघ्नातून मोकळा होतो त्याची मोठ्या पापापासून मुक्तता होते मोठ्या दोषापासून त्याची सुटका होते तो सर्व जाणणारा होतो. हे असे अथर्वशीर्षाचे फळ जाणावे. शान्ति मंत्राने हे उपनिषद् वाक्य पूर्णता पावते.

**श्री. शं. वा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*या लेख मालेतील पुढील लेख- संपादक*

**प्रास्ताविक : भारतीय संस्कृती, साहित्य आणि समाजशास्त्र**

असे उपशीर्षक देण्याचे समर्थनीय कारण आहे!! नुकत्याच आलेल्या ठाण्याच्या ८४व्या अखिल भारतीय मराठी संमेलनाच्या निमित्ताने जी काही वैचारिक आणि राजकीय वादळे निर्माण झाली, त्याचा प्रचारमाध्यमांनी उपयोग केलाच, पण, त्या मंथनातून कोणते प्रश्न उत्पन्न झाले, ते बघणे आवश्यक आहे!!

**संबाधित लेख**

'दिशाच्या' जानेवारी २०११ च्या अंकाचा मसूदा 'आम्ही' आगाऊ प्रत काढून अतिशय मार्यादित स्वरूपांत वाटला. पण, त्या अंकात साहित्य व संस्कृती ह्यांच्या संबधात जे प्रश्न उद्‌भवतात त्यावर चर्चा केली आहे. तेव्हा, संमेलनाचे अध्यक्ष व ते या वर्षातील साहित्य कारभारावर निरनिराळ्या उद्‌भवलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया व भाष्य करतीलच हे अपेक्षित आहे. पण, समाजाच्या काय अपेक्षा असाव्यात?

**संमेलनातील वैचारिक इतिहास :**

त्या संबंधात मी जो सन १८७८ पासूनच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी व्यासपीठावरून केलेल्या विचारांचा भागोवा घेतला, तो थोड्या अधिक-उण्या प्रकाराने दिशाच्या अंकातून मांडलाच आहे. तसेच त्याच विषयावर थोडेसे अगोदर विचार मांडले त्या पार्श्वभूमीवर आता साहित्य, संस्कृती, समाजपरिवर्तन, अध्यात्म वा स्पिरीच्यूअल सायन्स ह्याच्या अनुषंगाने, अनुत्तरित, प्रश्नांची उत्तरे शोधणार आहोत. प्रथम आपण केवळ साहित्य संमेनाच्या व्यासपीठावरून निर्देशिलेला काय अभ्यास झाला व निष्कर्ष काढले ते पाहूया. पण, अत्यंत प्रामाणिकपणे सांगावयाचे झाले तर संमेलनात ज्या विषयांवर चर्चा झाली त्यात एकसूत्रपणे ह्या मौलिक प्रश्नांना अग्रहक देऊन शोध घेतलेला दिसला नाही.

**कांही उल्लेखनीय भाषणे**

अपवादात्मक कांही तुटक संदर्भ कांही अध्यक्षांच्या भाषणात तुरळकपणे आढळले, पण त्यांत प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो तो १९७४ साली हैद्राबादला दिलेल्या **न.र. फाटक**, ह्यांच्या व्याख्यानाचा व त्यानंतर लगोलगच **आचार्य शंकर दत्तात्रेय जावडेकर यांच्या १९४९ साली पुण्याला दिलेल्या व्याख्यानाचा!!**

न. र. फाटक यांच्या व्याख्यानाने पुस्तकाच्या दूसऱ्या खंडात (मराठी साहित्य संमेलन-भीमराव कुलकर्णी) ३८ पाने व्यापली तर आचार्य जावडेकर यांनी ३४ पाने भारून टाकली. हे सर्व विचार सविस्तरपणे देत नाही, पण त्यांतील महत्वाचे निष्कर्ष सांगतो.



**श्री. न. र. फाटक** म्हणतात :- "साहित्य व संस्कृती, साहित्य आणि एकजिनसी राष्ट्रीयत्व (आतां

प्रातिकत्व म्हणू पाहिजे तर) यांची जोडी जगाच्या इतिहासात कधीच फुटलेली नाही. . . साहित्याचा हा महिमा गाण्याचे कारण हेच कीं, आधिभौतिक शास्त्रांच्या अभ्यासाचे स्तोत्र उराशी बाळगून साहित्याच्या परिशीलनाची उपेक्षा केल्यास देशामध्ये योग्य मनोविकासाचे नागरिक निपजणार नाहीत. **चित्ताच्या शुद्धीचे आणि चित्ताच्या उन्नतीचे साहित्य हे एकमेव साधन आहे.** ही जाणीव युरोपांतील यांत्रिक कारखान्यांच्या कामगिरीने गजबजलेल्या देशांनी देखील सोडलेली नाही. या जाणीवेला अनुसरून तेथील शिक्षणक्रमांत अधिभौतिक शास्त्रांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नागर गुणांत व्यंग राहु नये म्हणून, साहित्याचे शिक्षण सक्तीने यथाप्रमाण देण्याची व्यवस्था तिकडील विद्यापीठांनी अमंलात आणलेली दृष्टीस पडते.''

न. र. फाटक ह्यांनी ज्ञानेश्वरांच्या साहित्यकृतीतील काव्यातील परतत्वाचा स्पर्शाचा संदर्भ देत साहित्याचे अंतिम ध्येय सांगितले!

**''जे मराठीचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळ करीं।**

**घेणे देणे सुखाची वरी। हो देईं या जगा।।''**

साहित्य व संस्कृती ह्याच्या संबंधातील नात्यसंबंधी व त्याच्या एकत्रित जीवनउद्दिष्टांकडे बघण्याचा प्रयत्न आहे. आणि ह्या प्रयत्नांना मदत ही 'अध्यात्मविद्येवरून' होते आहे.

पण ही **'अध्यात्मविद्या'** जाणण्याची व जतन करण्याची जबाबदारी ही समाजाचा एक विभाग जवळजवळ स्वतंत्रपणे संभाळत असतांना दिसतो. त्यांतील ज्ञानाचा गाभा व साधना ह्या सुद्धा परंपरेने काही धर्मसंस्था, धार्मिक संप्रदाय, योग, तंत्र, मंत्र, या विद्येचे साधक. व संप्रदाय अवगत करून पाळत असतात. साहित्य निर्माण करणारे वा त्यांचे मान्यवर समीक्षकांनाही ह्या 'अध्यात्मविद्या' बद्दल फारशी खोलवर माहिती वा अनुभव नसतो. त्यामुळे, पठित आत्मविद्येच्या ज्ञानावर व लिखीत संहितांतील बुद्धीगम्य ज्ञानावर हा साहित्य समीक्षेचा व्यापार चालतो. तो नुसताच अपूर्ण नसतो, अनुभूती शून्य नसतो, पण, कित्येक वेळां परकीय संस्कृतीच्या विचार स्त्रोतांना बळी पडतो. पण ह्या साहित्याचा प्रभाव समाजावर पडल्यावर मूक संस्कृतीच्या स्त्रोतांत विकृत, **परकीय व पुष्कळदा मूळ बीज संकल्पनेवर आघात करणारे प्रवाह भोंवरे निर्माण होतात.**

हे अपरिहार्य आहे असे प्रथमदर्शनी वाटणारच!!

कारण संस्कृतीच्या ह्या वैश्विक प्रवाहाची कांहीही मौलिक माहिती किंवा ज्ञान सामाजिक संस्था एकत्रितपणे जपत नाहीत व नवनवीन पिढ्यांना संक्रमण करून सांगत नाहीत.

**सांस्कृतिक जबाबदारीच अभाव**

त्याचे कारण ही उघड आहे. संस्कृतीचे वैशिष्ट्य जतन करणे व त्यांची युगानुकूल संक्रमणे नियमीत करणे ही सामाजिक, राजकीय, आर्थिक भौतिकवादी यंत्रणेंची जबाबदरी समजली जात नाही.

पण, कुठल्याही पिढीत हे निरनिराळे प्रवाह एकमेकांपेक्षा अलगपणे, भिन्न उद्दिष्टांनी, भिन्न जाणीवेत, भिन्न गरजेंनी वहात असतात. भौतिक राज्यसंस्था वगैरे दैनंदिन कारभार पहाणाऱ्या मानवनिर्मित संस्था जरी जबाबदारी पत्करीत नसल्या तरीही हा सांस्कृतिक प्रवाह नष्ट होत नाही!!

त्यावर कळस म्हणजे **आधुनिक जागतिकरणाच्या युगांत** ह्या मूळ सांस्कृतिक प्रवाहावर जगणाऱ्या एखाद्या दैशिक अध्यात्मवादी प्रवाहावर सुद्धा जोराची नवीन तत्वज्ञानांच्या विचारांची वादळे झेपावत आहेत. त्यांचे चांगले वाईट परिणाम अभावितपणे होतच रहातात. आणि समाजशास्त्रज्ञ त्याकडे अशक्तपणे वा तटस्थपणे किंवा निर्विकारपणेही पहात बसतात. कारण, ही जबाबदारी कोणाची ह्याची निश्चिती नसते. किंवा **'भौतिकवादी राजसत्तेला'** त्याचे सोयर सुतक नसते!!

पण, तरीही कांही संवेदनाक्षम व सुसंस्कृत व्यक्ती वा समाजगट हे ह्या 'संस्कृतिक वैचारिक अराजकांची' दखल घेताना दिसतात.''

मुख्यत: ह्याचा मी ह्या संमेलनाध्यक्ष्याच्या भाषणांच्या' अनुरोधाने तलास घेतला. तेव्हां मला एक अध्यक्ष सांपडले.




आचार्य शंकर दत्तात्रये जावडेकर हे त्या अध्यक्षांचे नांव. आचार्य जावडेकर हे पुण्याच्या १९४० साली झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष होते. म्हणजे स्वातंत्र्य १९४७ साली मिळाल्याने केवळ २ वर्षांचा काळ गेला होता.

हा क्षण एक 'लँडमार्क' किंवा पथनिर दर्शक वा संक्रमण करण्याचा क्षण होता. अपेक्षेप्रमाणे आचार्यांनी त्या वेळच्या प्रचलित सामाजिक वैचारिक भूमिकेचा परामर्श घेतला. नवीन होणाऱ्या प्रयोगांचे विस्ताराने विश्लेषण केले व 'नवीन मानवी संस्कृतीचे नेतृत्व करण्याची' घोषणा, व्यासपीठावरून केली.

कोणती ती संस्कृती? कोण त्याचे धुरंधर नेते? कोणत्या वैश्विक सत्यावर ही संस्कृती उभी होती ? काय झाले त्या सांस्कृतिक प्रवाहाचे? आणि त्याची फलिते कोणती मिळाली? गुण, दोषांची वर्गवारी व जबाबदारी कोणावर? ह्या विषयांचा थोडासा खल करू या!

आचार्यांना हा काळ एका वैशिष्ट्यपूर्ण जागतिक युग क्रांतिचा वाटला. ते म्हणतात, ''आपला देश स्वतंत्र होऊन त्यांत हिंदी संघराज्य आणि पाकिस्तान अशी दोन सार्वभौम स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आलेली आहेत. ह्यापैकी हिंदी संघराज्य हे आजच्या जगात लौकरच पहिल्या प्रतीचे राष्ट्र बनावे एवढा मोठा त्याचा विस्तार व लोकसंख्या असून, त्याने ज्या पद्धतीने ज्या साधनांनी आणि ज्या वृत्तीने आपले राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले त्या पद्धतीत, त्या साधनात आणि त्या वृत्तीत कांही एक अपूर्वता निर्माण झालेली आहे याबद्दल कोणासहि शंका नाही.



ही पद्धति, ही साधने व ही वृत्ती ज्या असामान्य क्रांतिकारक संताने (महात्मा गांधी) शोधून काढून आमच्यामध्ये नवचैतन्य निर्माण केले त्या क्रांतिकारक संताच्या कार्यामुळे व त्याने आपल्या जीवनात प्रकट केलेल्या जीवननिष्ठेमुळे आधुनिक भारताच्या अंगी मानवाच्या संस्कृतीचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य येईल असा आत्मविश्वास आमच्या अंत:करणात निर्माण झाला असून आमच्या अंत:करणातील हा आत्मविश्वास निराधार व अनाठायी नाही अशी मान्यता जगांतील इतर राष्ट्रांकडून मिळू लागली आहे.'' त्यानंतर ते समाजमानसात रूढ असलेल्या त्या वेळच्या प्रचलित समाजशास्त्र वा धर्मधारणा यांचा परामर्श घेतात.

''साधुसंतांच्या भागवत धर्मात - आध्यात्मिक लोकशाहीच्या अधिष्ठानावर सामाजिक राजकीय किंवा

आर्थिक लोकशाहीची इमारत उठविण्यास लागणारी वास्तववादी व सर्वांगीण क्रांतिकारक दृष्टि नव्हती.''

''आधुनिक युगास साजेल असे लोकशाही राष्ट्र व लोकशाही संस्कृति सतराव्या शतकांत मराठ्यांना निर्माण करता आली नाही'' वैज्ञानिक जीवननिष्ठेबद्दल ते म्हणतात, ''मानवाला विज्ञानशास्त्राच्या वाढीमुळे जे प्रचंड सामर्थ्य प्राप्त झाले आहे, त्या सामर्थ्यांचा उपयोग सर्वमानवजातीचा संहार करण्याच्या कामी न करतां सर्व जनतेला हवा असणारा स्वर्ग पृथ्वीवर अवतरविण्याकडे मनुष्ये कसा करूं लागतील हाच आमच्यापुढील म्हणजे मानवसंस्कृती पुढील आज महत्वाचा प्रश्न आहे.

हा प्रश्न सोडविण्यास त्याला विज्ञानापेक्षा <u>मनोविज्ञान तत्वज्ञान, आणि आत्मज्ञान</u> यांचाच उपयोग अधिक होणार आहे.'' मग समाजात योग्य तो बदल करण्यांसाठी कोणते मार्ग व तत्वज्ञान उपलब्ध आहे - ह्या प्रश्नावर आचार्य काय सांगतात ते पहा.

''आजच्या जगात <u>विरोध विकासवादी भौतिकवादी</u> आणि <u>सत्याग्रह</u> ही दोनच तत्वज्ञाने विशेष महत्वाची असून त्या दोघांचा समन्वय करणे हेच तत्वज्ञान व समाजशास्त्र यांचे यापुढील कार्य आहे, असे मला वाटते. <u>सत्याग्रहाला अद्यापि शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालेले नाही व त्याची बुद्धीवादी दृष्टीने मांडणीहि झालेली नाही. सत्याग्रह अद्यापि आत्मप्रेरणेच्या अथवा स्फूर्तीच्या अवस्थेतच आहे.</u>

सत्याग्रहाची मूळ प्रेरणा <u>आत्मिक</u> असून मानवसंस्कृतीत <u>आत्मप्रेरणा, आत्मस्वातंत्र्य आणि आत्मबल</u> यांचे क्रांतिकारक व विधायक महत्व सत्याग्रहाने दाखवून दिले आहे.''

समाजवाद, वर्गविरोध व विरोधविकासाचें समाजशास्त्रीय तत्व, ही सत्याग्रहाने आत्मसात करावीत, किंवा ती त्यांत अंतर्भूत होतातच असे माझे मत आहे. तरी मार्क्सवाद्यांची धर्म व अध्यात्म यांच्याकडे पहाण्याची दृष्टी सत्याग्रहाला पटू शकेल असे मात्र मी केव्हाही म्हणत नाही. व म्हणणे शक्य नाही.

ह्या व्याख्यानात आचार्य कबूलच करतात, कीं, त्यांना <u>''सर्वोदयकारक नवा मानवधर्म'' भारतात काय पण जगातही प्रस्थापित व्हावा असे वाटत असले, तरी त्या मार्गाला ''बुद्धीवादी शास्त्र'' प्राप्त झालेले नाही;</u> आणि म्हणूनच मी आणखी जास्त शोध त्याच्या साहित्याचा घेतला. त्यांत प्रामुख्याने '<u>समाजवाद आणि सर्वोदय' (तुलनात्मक विवेचन) हे डिसेंबर १९५७</u> साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. (१९४९ ते १९५७ म्हणजे जवळजवळ ८ वर्षाचा काय लोटल्यावर ते ह्या विषयाचा पाठपुरावा कसा करतात हे बघण्याचा मी प्रयत्न केला. कशी घडणार ही सर्वोदयी क्रांति?

आचार्य म्हणतात, ''ही सामाजिक क्रांति बुद्धीबलाने अथवा मनपरिवर्तनाच्या युक्तिवादी पद्धतीने घडवून आणता येणार नाही. समाजाचा मूलभूत विश्वास अथवा निष्ठा यांत मतपरिवर्तन घडवून आणण्यास प्रागतिकांचे बुद्धिकला अथवा युक्तिवाद हे साधन अपूरे पडते, असा अनुभव आल्यानंतर '<u>आत्मबलाचा</u>' मार्ग गांधीजींनी शोधून काढला.

या आत्मबलाच्या मार्गात तीन प्रकारचे परिवर्तन अभिप्रेत असते.

या त्रिविध परिवर्तनासच <u>आचार्य विनोबा भावे</u> यांनी <u>''क्रांतीचा त्रिकोण''</u> असा यथार्थ शब्द वापरला आहे.

१) <u>मतपरिवर्तन</u>
२) <u>हृदय परिवर्तन, आणि</u>
३) <u>परिस्थिती परिवर्तन</u>

असे हे <u>त्रिविध परिवर्तन</u> समाजात घडवुन आणून कोणतीही समाजहितास आवश्यक क्रांती अहिंसेने घडवून आणतां येईल अशी सत्याग्रही निष्ठा आहे.

आत्मक्लेशाचा मार्ग स्वीकारून समाजाचे परिवर्तन आणि सामाजिक मूल्यांचे नवदर्शन घडवावे लागते. अशी क्रांती हीच खरी क्रांती व त्या क्रांतिशास्त्रालाच 'शास्त्रीय क्रांतिशास्त्र' असे नाव देता येईल. या सत्याग्रही दृष्टीने विचार करणाऱ्यास मार्क्सवादातून निर्माण होणारे हुकूमशाही क्रांतिशास्त्र अशास्त्रीय वाटते'' (पान १२४)

''कदाचित बादशहा खान या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या सत्याग्रही पठाणी नेत्याकडूनही (मुसलमानी जगांतही) या क्रांतीकारक धर्मभावनेचा फैलाव इस्लामी जगांत होऊ शकेल!'' (पान नं १४६)

पण, आपण ह्या वैश्विक संस्कृतीच्या प्रवाहाची का चर्चा करतो आहेत? स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतात ह्या मूळ सांस्कृतिक प्रवाहाची 'छिन्न भिन्न' अवस्था असतांना किंवा आपण असे म्हणू या कीं या प्रवाहाला निश्चित वळण लागावे असा विचार कां करतो आहोत? तसेच आचार्य जावडेकर, आचार्य विनोबा भावे व महात्मा गांधी यांना जे सामाजिक परिवर्तन व उच्च ध्येय प्रेरित संस्कतींची अभिवृद्धी व्हावी असे वाटत होते व त्याकरितां त्यांनी 'सर्वोदयी मानवी संस्कृतीचा 'सत्याचा प्रयोग' कां अंगिकारिला होता व हे बघायला हवे आणि त्याचा विचार आपल्या सध्याच्या साहित्य संस्कृती संमेलनाच्या चळवळीशी काय संबध हेही बघितले पाहिजे.

आचार्य म्हणतात ''जुन्या जगाची स्तुतीस्तोत्रे गाणारे साहित्य केवळ सुंदर म्हणून कोणास प्रिय वाटणार नाही. त्या मनाने अशा साहित्यातील सौंदर्यही वरकरणी सौंदर्यावर आसक्त होऊन निर्माण केलेली कला खरे सौंदर्यावर्णनही घडवू शकणार नाही असे मला वाटते.

म्हणून शास्त्रज्ञांनी व साहित्यिकांनीही संत व तत्वज्ञ यांच्याप्रमाणे या जागतिक क्रांतिचा प्रवाह कोणत्या दिशेला जात आहे, ती क्रांति कोणत्या जीवनानिष्ठेने यशस्वी करण्याचा प्रयत्न केला असता तिच्यातून मंगल अशा नव्या जगाची निर्मीती होऊ शकेल याचे ज्ञान करून घेतले पाहिजे. शास्त्रज्ञ, साहित्यिक, संत, व तत्वतेत्ते हे एकंदर समाजजीवनाशी जितके समरस झालेले असतील तितके ते कळत अथवा नकळत क्रांतिकारक बनतीलच आणि प्रतिक्रांतिकारक शक्तिंना न कळत साहाय्य करण्याचा प्रमाद त्यांच्या हातून घडणार नाही.


साहित्य परिषदा, साहित्य – संमेलने, विद्यापीठे इत्यादी संस्थांनी असे वातावरण निर्माण केले पाहिजे आपल्या समाजांत निर्माण होणारे साहित्य आजच्या समाजाला व त्यांत चालू असलेल्या संस्कृतिकार्याला पोषक व मार्गदर्शक बनावे यासाठी या संस्थांनी खटपट करावयाची असते व ती तशी करण्यासाठीच आपण आज येथे जमलो आहो.''

तात्पर्य, समाजाचा सर्वोदय व्हावयाचा असेल तर त्यात विज्ञान, समाजज्ञान, मनोविज्ञान आणि आत्मज्ञान या सर्वांचीच वाढ झाली पाहिजे. आणि त्या संस्कृतीच्या संवर्धनात विज्ञानशास्त्रज्ञ संत, साहित्यिक, समाजशास्त्रज्ञ आणि आत्मज्ञानी तत्ववेते या सर्वांचे सहकार्य झाले पाहिजे.''

येथपर्यंत आपण ह्या साहित्य परिषद संमेलने ह्याचा वैचारिक प्रवासाचा व चळवळीचा थोडासा प्रतिनिधीक स्वरूपाचा मागोवा घेतला. त्यामध्ये मराठी भाषा, महाराष्ट्र धर्म, भारतीय संस्कृती समाजशास्त्र राज्यशास्त्र आणि थोड्या अत्यल्प प्रमाणात अध्यात्मशास्त्र यांच्या ज्ञानमार्गाने समाजाच्या सांस्कृतिक उद्धाराचा मार्ग शोधला. साहित्य हे सांस्कृतिक प्रवाहावरच जगते आणि ह्या प्रवाहाला समाजजीवनांतून चालणाऱ्या अनुभूती व जीवन मूल्याच्या प्रवाहाचा अनुभव कथन करीत जाते.

मग, तरीही ह्या सांस्कृतिक, प्रवाहाच्या धारणा अपेक्षेप्रमाणे उंचावत जाणाऱ्या कां दिसत नाहीत?

**संमेलन ठाणे २०१० :**




आपण जर ठाण्यात झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांतील अध्यक्ष मा. उत्तमराव कांबळे ह्यांच्या भाषणातून वेध घेतला तर काय दिसते?

एखाद्या चलचित्रासारखी त्याची आठवण करूया!

अध्यक्ष माननीय उत्तम कांबळे म्हणाले,

''आपल्या वाटचालीचं ८४ वे पाऊल टाकणारे हे संमेलन आता उत्तर आधुनिकतेत उभं आहे.


त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणांत कधी नव्हे एवढ्या मोठ्या आवाजात विज्ञान-तंत्रज्ञानाचे स्फोट होत आहेत. चंद्रावर-मंगळावर स्वाऱ्या करण्यासाठीच्या अर्जांचाही जनाच्या कचेरीत ढीग सांचतो आहे.

'सुपर सुपर एक्स्प्रेस हायवेवरून' जग धावतं आहे. संशोधन आणि प्रतिनिसर्ग बनवण्यासाठी माणसाच्या सुरू असलेल्या लढाया, या साऱ्यांमुळे जग चालण्याऐवजी धावत आहे.

काही जण गांव सोडून धांवताहेत. तोंडातून फेस आणि आंतडी बाहेर पडेपर्यंत धावताहेत – स्वप्नांसह धावताहेत–

मी स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेलो आणि सतत धांवत अस्थिर होत असलेल्या जगाचा एक प्रतिनिधी आहे.

मी कधी-कधी चिडून म्हणतो, हे जग कुणाचं? जगणाऱ्यांचं की मरणाऱ्यांचे? विकासाचा दर उचल आकड्यांत जातानाही मृत्यू आणि विकासाचा आंकडा घसरतानाही मृत्यू . . .!! असं माणूसघाणं जग निर्माण व्हावं हे काही बरोबर नाही.



आपलं साहित्य हे सारं मुकाटपणे, त्रयस्थपणे पाहत राहणार की हालचाल करणार आहे?

माणसाच्या जगण्याला जसं एक प्रयोजन असावं लागतं, तसं साहित्यालाही एक प्रयोजन असवं आणि असावयालाचं हवं. यासाठी मी आग्रही आहे. मुल्यांवर फुंकर घालण्याचं काम साहित्याला करावं लागणार आहे.

मी नव्या युगाचा, नव्या जगाचा आणि जग बदलण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांचा एक प्रतिनिधी आहे. बोलत राहू या काही करत राहू या सर्व प्रकारचे भेदाभेद ओलांडून जाण्यासाठी साहित्याची मदत घेऊ या, तस साहित्य तयार करू या.

एवढं बोलून मी थांबतो. धन्यवाद.''

१९४९ चे 'आचार्य जावडेकर दर्शन' व २०१० चे 'उत्तम कांबळे दर्शन' अशी साहित्य संमेलनांच्या सहस्रदर्शनाची वाटचाल आहे.

मनुष्य मोठा विचित्र आहे. तो सुख घटाघटा पितो, पण दुःख मात्र चघळीत बसतो.

जावडेकर दर्शनात 'सामाजिक मूल्यांचे नवदर्शन' व अहिंसक 'शास्त्रीय क्रांतिशास्त्राच्या बळावर सामाजिक क्रांति ही दिशा आहे. तिचा प्रोग्रॅम विनोबाजींचा 'क्रांतिचा त्रिकोण' म्हणजे

१) मतपरिवर्तन २) हृदय परिवर्तन
३) परिस्थिती परिवर्तन

असा विधायक 'पॉझिटिव्ह' ॲप्रोच आहे. पण, ही तीन परिवर्तने गेल्या ६४ वर्षांत झाली कां? त्या परिवर्तनाचा अहवाल ठाण्याला देण्यासाठी श्री. उत्तमरावांना अध्यक्षपद दिले व नवीन मार्गदर्शन देण्याची अपेक्षा केली. मात्र ह्या उत्तम कांबळे दर्शनात "अर्जुन विषाद योग" आढळला.

हा एक भगवद्गीतेतील प्रथम अध्यायच बघावयाला मिळाला. असे कोणी म्हणेल!

कारण, यांत चिंता आहे, मूल्यांना 'फुंकर' घालण्याची सात्विक इच्छा आहे, पण त्यांत नक्की सामाजिक क्रांति वा उत्क्रांति मार्गाची दिशा किंवा निर्णयही नाही.

<u>असे का व्हावे? माफ करा, पण –</u>

ह्याचे कारण असे आहे की हा <u>'प्रतिमात्मक क्षत्रिय लेखणी बहाद्दर अर्जुन' व 'धर्म जाणणारा' त्याचा 'श्रेष्ठ अहिंसक सर्वोदयी युधीष्ठिर', हे दोघेही अशा भूमीवर</u> आहेत कीं त्यांचे 'खरे दर्शन व ज्ञान' होण्याचे अजुनही शिल्लक आहे.

आंधळ्या धृतराष्ट्री राजसत्तेला हा कुरुक्षेत्र व धर्म क्षेत्रावरचा महाभारताचा संग्राम पहावयाचा आहे व अनुभवाचाही आहे.

महाभारतातील संजय चा T.V. Show व्हावयाचा आहे! तुलनेने महायोगी अरविंदांच्या दर्शनात ते म्हणतात

"Arjuna, is the type of struggling human soul, who has <u>not yet received the knowledge,</u> but has grown fit to receive it.

Arjuna, is the man of action and not of knowledge, the fighter, neither the seer or the thinker.

Lord Krishna seizes him at a moment of his psychological development by egoistic actions, when all the mental, moral, emotional values of the ordinary egoistic and social life of man have collapsed in a sudden baucrupy, and he has to lift him up out of this lower life into higher consciousness."



त्यामुळे मराठी साहित्यात उच्च मूल्यांच्या शोधात धडपडणाऱ्या ह्या अर्जूनासारख्या अनेक पांडवांना हे महाभारत युद्ध करावेच आगेल, पण हे आहे 'धर्मयुद्ध!! खेळावे लागणार आहे, 'धर्मक्षेत्री', आणि, कुरुक्षेत्री भौतिकातही! <u>हे साक्षात्कारी ज्ञान व मार्ग कोणते?</u>

त्याचा अर्थ समजण्यासाठी आपण दिशाच्या पुढल्या अंकाची वाट पाहू या!!

।।कृष्णार्पणमस्तु ।।

श्री. यशवंत साने
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

तुमचे स्वत:चे दारिद्र्य निवडण्यास पैसा तुम्हाला संधी देत असतो.

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

### ➢ अभिनंदन!

'प्रेरणा' व ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'ठाणे' या विषयावर आयोजित निबंध स्पर्धेत कु. अक्षया जयंत पाटील हिला उत्तेजनार्थ सन्मानपत्र प्राप्त झाले. एकूण ४५५ निबंधांचा सहभाग या स्पर्धेत होता.

श्री. माँ बालनिकेतन शाळेतर्फे १८ वी आंतरशालेय स्पर्धा आयोजित केल्या होत्या. मराठी वक्तृत्व स्पर्धेत शिक्षण व खेळातून 'राष्ट्रीय एकात्मतेचा विकास' या विषयावर कु. प्रणिता हनुमंत काळभोर - ८अ हिला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिकाचे स्वरूप सुवर्णपदक, प्रमाणपत्र व ३०० रु. रोख असे आहे.

याच शाळेतर्फे घेण्यात आलेल्या संस्कृत भगवत्गीता पाठांतर या स्पर्धेत शाळेतील शुभम् रमेश पवार या विद्यार्थ्याला तृतीय पारितोषिक मिळाले.

### ➢ कर्करोग जागृती

२२ डिसेंबर रोजी विजयकुमार गोखले यांनी इ. ९वी च्या विद्यार्थ्यांना कर्करोगासंबंधी माहिती, कर्करोगाची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय याबद्दल सोप्या भाषेत महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली. श्री. गोखले यांनी 'टाटा कॅन्सर रिसर्च' मध्ये 'कॅन्सर अवेअरनेस एक्सपर्ट' म्हणून ३२ वर्षे सेवा केली आहे.

### ➢ मनोरंजनातून जागृती

३० डिसेंबर रोजी इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना 'संवेदना' हा चित्रपट दाखवण्यात आला. मुलांचे संवेदनशील मन आणि त्यांची भावनिक गरज या संदर्भात मोठ्या व्यक्तींची भूमिका या बाबींचे चित्रण या चित्रपटात होतेण

तसेच इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना 'मला जगायचं आहे' हा HIV च्या संदर्भात जागरूकता निर्माण करणारा चित्रपट दाखवण्यात आला.

हे दोन्हीही चित्रपट बालचित्रवाणीतर्फे दाखवण्यात आले.

### ➢ व्याख्यान

२७ डिसेंबर रोजी इ. १० अ, ब, च्या विद्यार्थ्यांसाठी बीजगणितातील 'सांख्यिकी' या प्रकरणासाठी श्री. उदयन साठे (बी.एस.सी.बी.एड्.) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी या प्रकरणातील प्रत्येक उदाहरणावर विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत चर्चा केली व शंका समाधान केले.

तसेच ८ जानेवारी रोजी इ. ५अ, ब, क च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयातील 'नैसर्गिक साधनसंपत्ती' या पाठासाठी श्री उदयन साठे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

### ➢ सावित्रीबाई फुले जयंती

३ जानेवारी रोजी शाळेत 'भारतीय स्त्री-शिक्षणाच्या उद्गात्या' सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने इ. ९ अ मधील पाच विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडून दाखवला. तसेच दुपार

विभागात इ. ६ वी ते ८ वी च्या वर्गांमधून १५ विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली.

दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांना मा. मुख्याध्यापक श्री. गवई सर यांनी या निमित्ताने मार्गदर्शन केले.

➢ **अभिनंदन!**

अंकिता हणमंत दुधे हिला कराटेमध्ये अनेक पारितोषिके मिळाली आहेत. जानेवारी २०१० ते डिसेंबर २०१० या संपूर्ण वर्षात तिला 'कुमिथे' या प्रकारात तीन रजतपदके व एक कांस्यपदक मिळाले 'काथाज' या प्रकारात चार रजतपदके, एक कांस्यपदक व दोन सुवर्णपदके मिळाली. 'टीम काथाज' या प्रकारात एक कांस्यपदक एक रजतपदक व एक सुवर्णपदक मिळाले. तसेच 'कुमिथेज' या प्रकारात एक कांस्यपदक व एक सुवर्णपदक मिळाले.

अशा कराटे चॅम्पीयन अंकिताचे हार्दिक अभिनंदन!

➢ **दी लॅड ट्रॉफी**

२४ डिसेंबर झालेल्या आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत १६ वर्षाखालील मुलांच्या संघ विजयी झाला. या स्पर्धेत वैष्णव विश्वनाथ सकपाळ यास 'उत्कृष्ट खेळाडू', तर प्रणय म्हात्रे यास 'उत्कृष्ट गोलंदाज' म्हणून चषक प्राप्त झाले.

➢ **अभिनंदन!**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (C.K.P) सोशल क्लब आयोजित राष्ट्रीय 'स्फूर्तिगीतगायन' स्पर्धेत इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'भारत वंदे मातरम्' या गीतास द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिकाचे स्वरूप, शाळेला ट्रॉफी, मुलांना प्रशस्तिपत्रके व रु. ३००/- रोख असे आहे. या गीतास मार्गदर्शन सौ. कारंडे-जोशी यांनी केले होते.

➢ बालक मंदिर संस्था, कल्याण येथे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आपल्या शाळेतील विद्यार्थीनी कु. प्रणिता हनुमंत काळभोर, ८ अ हिला द्वितीय पारितोषिक मिळाले. प्रमाणपत्र व रोख रु. ३००/- असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. ही स्पर्धा दोन फेऱ्यांत पार पडली. पहिल्या फेरीत ठरवून दिलेल्या विषयावर बोलायचे होते. तर दुसरी फेरी उत्स्फूर्त होती.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा पूर्व प्राथमिक विभाग

➢ **असे होते वर्ष २०१०**

नुकतेच आपण सर्वांनी २०१० ला निरोप दिला, तर २०११ सालाचे उत्साहात स्वागत केले. इंग्रजी कालगणनेप्रमाणे नवीन वर्ष सुरु झाले. पण शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी नवीन वर्ष सुरु होते ते १५ जूनला. १५ जून रोजी शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. नवीन मुले त्यांच्या नवीन शाळेत येण्यास तर शिक्षकवर्ग त्यांचे स्वागत करण्यास अतिशय उत्सुक होते. याही वर्षी अनेक उपक्रमांची रेलचेल होतीच. त्याचा हा थोडक्यात आढावा.

**१) आषाढी एकादशी** – या निमित्ताने मुलांना विठ्ठलाचा गजर व श्लोक शिकवले गेले. त्या दिवशीचे औचित्य साधून 'झाडे लावा, झाडे जगवा' याचे महत्व मुलांना सांगण्यात आले. प्रत्येक शिक्षकाने एका गटाचे एक, अशी झाडे लावली. झाडांना आपले मित्र बनवा, त्यांना रोज पाणी घाला त्यांच्याशी बोला असेही शिक्षकांनी मुलांना सांगितले.

प्राथमिक विभागाने याच विषयावर आधारित आयोजित केलेल्या दिंडीतही मुले सहभागी झाली. मुलांना शेंगदाणे व गूळ असा प्रसाद देण्यात आला.

**२) १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन) –** या निमित्ताने मुलांना झेंड्याची गाणी शिकवण्यात आली. झेंड्याचे रंग, त्याची सूचकता मुलांना सांगितली. ज्यूनियर के.जी. मधील मुलांनी झेंडा घेऊन राष्ट्रगीत म्हटले, तर सीनियरच्या मुलांनी झेंडा स्वतःच तयार केला. स्वतःच तयार केलेला झेंडा अभिमानाने मिरवत मुलांनी शाळेतच वर्गात झेंडावंदन केले.

**३) नागपंचमी –** (१३ ऑगस्ट) नागाची प्रतिमा एका वर्गात मांडून प्रत्येक शिक्षिकेने आपल्या वर्गातील मुलांसोबत त्याचे पूजन केले. नागाची पूजा का करायची, तो शेतकऱ्याचा मित्र कसा आहे, याची माहिती मुलांना दिली गेली. विविध प्रकारच्या नागासंबंधीची माहिती देणारा माहितीपटही या दिवशी मुलांना दाखवला. सिनीयर के.जी. च्या मुलांनी याबद्दची चित्रे सुद्धा काढली. लाह्या, बत्तासे मुलांना प्रसाद म्हणून देण्यात आला.

**४) रक्षाबंधन –** सोमवार २३ ऑगस्ट रोजी शाळेत राखी पौर्णिमा साजरी झाली. मुलांनी नवीन कपडे घातले होते. सिनियर के.जी.च्या मुलांनी दोन्ही (म्हणजे ज्यूनियर व सिनियर) विभागाच्या मुलांसाठी साध्या सुंदर राख्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली बनवल्या होत्या. मुलांनी मुलींना, तसेच मुलींनी मुलांना राख्या बांधल्या. नारळाची वडी त्यांना खाऊ म्हणून दिली.

**५) दहिहंडी –** १ सप्टे. रोजी आम्ही उत्साहात दहिहंडी साजरी केली. दहिहंडीची तयारी २-३ दिवस आधीच सुरू झाली होती. मुलांना एकावर एक थर कसे करायचे, हंडी कशी फोडायची याचे प्रात्यक्षिक, प्रॅक्टीस दिली जात होती. सगळी मुले साध्या वेशात आली होती. दहिहंडीची गाणी असलेली कॅसेट लावली होती, मुलांना 'गोविंदा रे गोपाळा' अशी अक्षरे असलेल्या पट्ट्या बांधल्या, कपाळाला गंध लावून आमचे गोपाळ तयार झाले. हंडीमधे विडा, पान, सुपारी, पोहे, काकडी वगैरे घालून आजूबाजूला फुगे, रंगीत पट्ट्या लावून हंडी सजवण्यात आली. दोन्ही विभागातील काही मुले कृष्णाची वेशभूषा करून आले होते. एकावर एक थर लावून शिक्षकांच्या मदतीने छोट्या गोपाळांनी हंडी फोडली. दही, काकडी, पोहे, दूध, साखर घातलेला गोड प्रसाद शिक्षकांनी मुलांना वाटला.

**६) गणपती –** घराघरातून साजरा होणारा गणेशोत्सव आम्हीही मोठ्या आनंदात साजरा केला. ज्युनियर व सिनियर मधली ठराविक मुलांसोबत शिक्षकांनी गणपती आणला. मुलांना गणपती स्तोत्र आणि श्लोक शिकवले ते मुलांनी म्हटले. शाळेत सगळ्या वर्गांत व व्हरांड्यात गणपतीसंबंधी तक्ते लावण्यात आले होते. गणपतीची विविध रूपे, आगमनापासून विसर्जनापर्यंत सगळे उपचार असलेली चित्रे लावण्यात आली होती. गणपतीची मूर्ती आणल्यावर शिक्षकांनी त्याची पूजा केली. मुलांसोबत शिक्षकांनी आरती केली. मुलांनी गणपती स्तोत्र म्हटले. दुसऱ्या दिवशी बादलीत गणपतीची मूर्ती विसर्जित करण्यात आली. तलावात विसर्जन का करू नये, याचे कारण मुलांना समजावून सांगण्यात आले. बऱ्याच मुलांनी हे घरी सांगितले, घरच्या गणपतीचे विसर्जन घरीच केल्याचे सांगितले. मुलांना चिकणमातीचे गणपती करण्यास दिले, गणपतीची चित्रे रंगवण्यात देण्यात आली. अशा रीतीने गणेशोत्सव यावर्षी साजरा झाला.

**७) दसरा, भोंडला (शुक्रवार १५ ऑक्टोबर) –** गणपतीच्या विसर्जनानंतर काहीच दिवसात देवीचे आगमन झाले. यानिमित्ताने देवीचे काही श्लोक मुलांना शिकवले. या दिवसात घरोघरी भोंडला खेळण्याची प्रथा आहे. आताच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला हे शक्य होत नाही. शाळेतूनच या गोष्टींची माहिती मुलांना देणे योग्य वाटते. रंगीबेरंगी कपडे घालून मुले शाळेत आली. तळ मजल्यावर मधोमध पाटावर सजवलेल्या

हत्तीची स्थापना केली गेली. विभागप्रमुख सौ. मेघना मुळगंद यांनी हत्तीची पूजा केली. मग भोंडल्याला सुरुवात झाली. मुलांना गाणी ऐकून फार मजा वाटत होती. एका गाण्यात काही मुलांची नावे गुंफण्यात आली, याच गाण्यात जेव्हा शिक्षकांची नावे गायली तेव्हा मुलांना फारच गंमत वाटली. भोंडल्याचा प्रसाद म्हणून मुलांना राजगिरा लाडू देण्यात आला.

**८) दिवाळी** – आनंदाचा, उत्साहाचा, उजेडाचा परमोच्च बिंदू म्हणजे दिवाळी. आम्ही शाळेतही मोठ्या दिमाखात हा सण साजरा करतो. सिनियरच्या मुलांना विविध प्रकारचे कंदिल रंगवण्यास दिले होते. प्रवेशव्दाराजवळ आणि सगळ्या वर्गातून दिवाळी संबंधीचे तक्ते लावण्यात आले, फुलांनी व कंदिलांनी वर्गात सजावट करण्यात आली, त्याबरोबर पणत्या लावून वर्ग उजळून निघाले. मुलं नवीन कपडे घालून आनंदाने शाळेत आली. शिक्षकांनी मुलांबरोबर दिवाळीची गाणी म्हटली. छोटे छोटे फटाके सुद्धा लावले. सर्व मुलांनी एकत्र फराळ केला व तो चविष्ट असल्याची दादसुद्धा दिली. नंतर मित्रमैत्रिणी व शिक्षकांना 'शुभ दीपावली' म्हणून शुभेच्छा देऊन मुलं आनंदाने 'दिवाळी सुट्टी' हे मज्जा!! म्हणत घरी गेली.

पहिल्या सत्रातील उपक्रमांचा घेतलेला हा धावता आढावा.

➤ **महिना डिसेंबर**

डिसेंबर महिना सर्वसाधारणपणे सहल, वार्षिक स्नेहसंमेलन, नाताळ यांची भरगच्च भरलेला असतो. नंतर क्रीडास्पर्धा, वर्ष संपणार मग ते साजरे करण्याचे वेध लावणारा असतो. अभ्यासावर लक्ष कमी आणि इतर कलागुणांना वाव देणारा असा हा डिसेंबर महिना! याच महिन्यातील काही कार्यक्रमांची माहिती मी पुढे देत आहे.

यावर्षी १५ डिसेंबरला ज्यूनियर के.जी., तर १८ डिसेंबरला सिनियर के.जी. चे कार्यक्रम तर १९ डिसेंबरला 'आजी-आजोबा दिवस' साजरा करण्याचे ठरले. डिसेंबर महिना सुरू होताच सर्व शिक्षक जोमाने तयारीला लागले. नवीन गाणी शोधणे, मुलांची संख्या, किती वेळाचा कार्यक्रम ... एकंदरीतच कार्यक्रमांच्या रुपरेषेवर जोरदार चर्चा व कृती चालू होती.

**१) १५ डिसेंबर** – ज्यूनियर के.जी. च्या मुलांचे वय लहान असल्याकारणाने त्यांच्या मनोरंजनात्मक कार्यक्रम लहान प्रमाणात साजरा होतो. वेशभूषेचे बंधन न ठेवता मुलांना जी वेशभूषा सहज सांभाळता येईल, अशाच गाण्यावर मुले नृत्य सादर करतात. यावर्षी बुधवार १५ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५ वा. विद्यालंकार सभागृहात मुलांचा हा कार्यक्रम झाला, तर त्या समोरील पटांगणात आसनव्यवस्था केली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी प्रास्ताविक केले. या लहान मुलांचे नृत्य बसवणे किती कठीण आहे व शिक्षकांना या दरम्यान आलेल्या अनंत अडचणी याबद्दलची कल्पना त्यांनी पालकांना दिली. शाळेत रोज म्हटले जाणारे श्लोक काही मुलांनी म्हटले आणि देवाच्या आशीर्वादाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सहल, प्राणी, पक्षी, भाज्या यांवरील सुरेल गाण्यांवर मुलांनी नृत्याचे सादरीकरण केले. ज्यूनियर के.जी. च्या मुलांची प्रथमच न घाबरता सादर केलेल्या या त्यांच्या पहिल्या वहिल्या सादरीकरणाचे सर्व पालकांनी व उपस्थितांनी कौतुक केले.

**२) १८ डिसेंबर** – सिनियर के.जी.ची मुले वयाने थोडी मोठी असतात, त्यामुळे त्यांना गाण्यासठी आवश्यक वेशभूषा घालून सादरीकरण करणे शक्य होते. यावर्षी शनिवार १८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सिनियर के.जी. चे स्नेहसंमेलन पार पडले शिक्षकांनी वेगवेगळ्या

भाषांतील वेगळ्या विषयांवर आधारित गाण्यांची निवड केली होती. विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी प्रास्ताविकपर भाषण केले. यानंतर सिनियर के.जी. च्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, हिंदी, मराठी भाषांतील गाणी, नृत्य तसेच नाटुकले सादर केले. उपस्थितांनी मुलांच्या या कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

**३) १९ डिसेंबर –** गेली पाच वर्षे 'आजी आजोबा दिवस' शाळेत साजरा केला जातो. यावर्षी प्रथमच हा कार्यक्रम दोन्ही विभागांच्या आजी-आजोबांसाठी आयोजित केला होता. आजकालच्या धावपळीच्या युगात दिवसभर ऑफिसमधे असणाऱ्या पालकांना आधार असतो. घरातील वडीलधाऱ्यांचा मुलांचे म्हणजे नातवंडांचे मोठे पालक, अर्थात आजी-आजोबा, अशा या स्पेशल आजी-आजोबांसाठी दरवर्षी हा दिवस त्यांच्यासाठी खास करण्याचा प्रयत्न आम्ही करतो. मनोरंजनाचा कार्यक्रम छोटीशी भेट व चहापान के.जी. च्या मुलांकडून आजी-आजोबांना देण्यासाठी फोटो फ्रेमस् करून घेण्यात आल्या होत्या. त्या देऊन अत्तर लावून त्यांचे स्वागत केले गेले.

शाळेची माजी विद्यार्थीनी सौ. राखी चिकटे पाटील हिने तिचा शिष्यांबरोबर नृत्याचा बहारदार कर्यक्रम सादर केला. कार्यक्रमाची सुरुवात व शेवट गणेश वंदनेने झाली. १ ते १ ॥ तास अतिशय तल्लीन होऊन सर्वांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला. हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल अनेक आजी-आजोबांनी शाळेचे आभार मानले.

**४) क्रीडादिन – (२२ डिसेंबर)** यावर्षी प्रथमच क्रीडादिनाचे आयोजन आमच्या मुलांसाठी करायचे ठरले. ज्युनियर व सिनियर के. जी तील मुलांचा वयोगट शारीरिक क्षमता लक्षात घेऊन साधे सोपे खेळ निवडायचे असं शिक्षकांनी ठरवले. प्रत्येक गटासाठी १ खेळ असे १० गटांचे १० खेळ निवडले ज्युनियरसाठी चमचा मणी, भाज्या शोधा, प्राण्यांची शर्यत, रंग शोधा, आकार शोधा हे पाच, तर सिनियरसाठी फुगे फोडणे, आपल्या जोडीदाराला टिकल्यांनी नटवणे, सांगितलेल्या वस्तू शोधून आणणे, मणी ओवणे, लहान मोठ्या आकाराच्या रिंगा लावणे असे ५ खेळ निश्चित झाले.

मुलांना फारच उत्सुकता होती 'आपण दिवसभर फक्त खेळणार म्हणून!' सर्व मुलांना तळ मजल्यावर नेण्यात आले. वर्गशिक्षिकेने खेळाप्रमाणे वर्गातील मुलांना सूचना दिल्या. मुलांनी क्रीडादिनाची मजा लुटली. आपले मित्र-मैत्रीण खेळताना त्यांनी टाळ्या वाजवून, त्यांच्या नावाने हाका मारून त्यांना प्रोत्साहित करत असलेली ही मुलं फारच दंग करत होती.

क्रीडास्पर्धा नाही, त्यामुळे पहिला दुसरा कोणी नाही, सगळेच जिंकले म्हणूनच त्यांना बिस्किटाचा खाऊ दिला. बक्षिस म्हणून ज्युनियरला रंगीत खेळणी भेट तर सिनियरच्या मुलांना पेन्सिल व रबर देण्यात आले.

क्रीडादिनाचे प्रथमच वर्ष असल्याने शिक्षकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. व मुलांनी मजा केलेली बघून तर फारच आनंद झाला.

यापुढील प्रत्येक वर्षी नवनवीन खेळांनी हा क्रीडादिन नक्कीच साजरा होईल.

**५) २४ डिसेंबर, नाताळ –** २५ डिसेंबरला असणारा नाताळ शाळेत शुक्रवार २४ डिसेंबरला साजरा झाला. प्रवेशद्वाराजवळ 'येशू ख्रिस्ताच्या जन्माची' कथा सांगणारा देखावा मांडण्यात आला होता. चांदण्या, ख्रिसमसचे झाड याने आजूबाजूची सजावट केली होती. यासंबंधीचे तक्ते व्हरांड्यात शिक्षकांनी लावले होते. सिनियर के.जी.चा एक मुलगा सांताक्लॉज बनून आला, त्याने सर्व मुलांबरोबर गाणी म्हटली. नाच केला. मुलांना

हजारो गाईमधून गाईचा वासरू आपल्या आईला शोधून काढतो, त्याचप्रमाणे पूर्वजन्मातील कर्म कर्त्याच्या मागोमाग पुढच्या जन्मातही येतात.

या निमिताने केकचा गोड खाऊ देण्यात आला. विविधरंगी कपडे घालून शाळेभर नाचणारी ही आमची चिमुरडी नाताळच्या शुभेच्छा देऊन आनंदाने घरी गेली.

**सौ. प्रिती कुलकर्णी**
शिक्षिका, पूर्व प्राथमिक विभाग
सौ. ए. के. जोशी इंग्लीश मिडियम स्कूल

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

**➢शशी जोशी स्मृती अभिनय स्पर्धेचा निकाल :**

आमच्या शाळेने सादर केलेल्या 'क : रक्षति:' या संस्कृत नाट्यप्रवेशास, स्पर्धेत खालील ४ पारितोषिक मिळाली :

१) सर्वोत्कृष्ट नाट्यप्रवेश पारितोषिक

२) सौ. मैत्रेयी शेवडे - सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पारितोषिक

३) वैयक्तिक अभिनय पारिताषिक उत्तेजनार्थ - कु. सानिका गोरे

४) वैयक्तिक अभिनय पारितोषिक उत्तेजनार्थ - कु. मयंक पाटणकर

दिग्दर्शिका - सौ. मैत्रेयी शेवडे

नेपथ्य - सौ. अस्मिता मोहिले, सौ. प्रियांका भंगाले

संगीत दिग्दर्शन - सौ. वीणा जोशी

तबला - कु. रोहित जोशी

सहभागी कलाकार - कु. सानिक गोरे, कु. मयंक पाटणकर, कु. शांभवी जोशी, कु. विभव रानडे, कु. गौरांग साने, कु. अर्थव जोशी, कु. तन्मय गिरी, कु. श्रेयस जोशी

**➢ हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१०-२०११**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५वी | बालबोधिनी | ३७ | ०२ | १७ | १० | ०८ |
| ६वी | प्राथमिक | १६ | - | ११ | ०२ | ०३ |
| ७वी | प्रवेशिका | ०६ | ०१ | ०४ | - | ०१ |
| ८वी | सुबोध | ०४ | - | - | ०१ | ०३ |
| ९वी | प्रबोध | ०३ | - | ०१ | ०२ | - |

**➢ वार्षिकोत्सव २०१०-२०११**

१६ डिसेंबर रोजी माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन झाले. आमच्या शाळेचा माजी विद्यार्थी मितेश कुलकर्णी, मंत्री डेव्हलर्सचा उपाध्यक्ष आणि कार्यकारी प्रमुख, (हैदराबाद) यांनी अध्यक्षस्थान भूषविले. कोल्हटकर मॅडम यांनी पालकांचे स्वागत करुन प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर त्यांनी २०१०-२०११ च्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. करंदीकर सरांनी कार्यक्रम यशस्वी होवो असे आशीर्वादरूप भाषण करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. शालेय आणि शालेतर गोष्टींमधे प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**➢ क्रीडादिन २०१०- २११ :**

या वर्षीचा क्रीडादिन इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थांसाठी दि. २२ डिसेंबर रोजी तर इ. ८ वी, ९ वी च्या विद्यार्थांसाठी दि. २३ डिसेंबर रोजी मावळी मंडळ येथे आयोजित केला होता. विद्यार्थ्यांसाठी खालील स्पर्धा होत्या.

इ. ५ वी ते ७वी :
वैयक्तिक स्पर्धा - ६० मि. १५० मि. ३०० मि. धावणे
स्पर्धा - लांब उडी, गोळा फेक.
सांघिक स्पर्धा - डॉज बॉल

इ. ८ वी ९ वी :
वैयक्तिक स्पर्धा - ६० मि. ३०० मि. (मुली), ६०० मि. (मुले) धावणे
स्पर्धा - लांब उडी, गोळा फेक
सांघिक स्पर्धा - रिले रेस, डॉज बॉल (मुले), थ्रो बॉल (मुली)

➢ **अमरकोश पाठांतर स्पर्धेचा निकाल:**

| | | |
|---|---|---|
| इ. ६ वी | अदिती भाभे | प्रथम क्रमांक |
| इ. ९ वी | अंकिता कलघटगी | प्रथम क्रमांक |
| | सोनाली ढापरे | तृतीय क्रमांक |

**सांस्कृतिक कला दर्पण आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धांचा निकाल:**

| क्र | स्पर्धा | गट | विद्यार्थ्यांचे नाव | निकाल (क्रमांक) |
|---|---|---|---|---|
| I | चित्रकला | ८वी ते १०वी | अर्चना जाधव | १ ली |
| | | | मिताली पारकर | २ री |
| | | | श्रेया जोशी | उत्तेजनार्थ |
| II | हस्ताक्षर | ५वी ते ७वी | शांभवी जोशी | २ री |
| | | | श्रेया जोशी | उत्तेजनार्थ |
| | | ८वी ते १०वी | निकिता पवार | २ री |
| III | निबंध | ५वी ते ७वी | शांभवी जोशी | १ली |
| | | ८वी ते १०वी | संकेत पंडीत | २ रा |
| IV | गायन | ५वी ते ७वी | श्रेया जोशी | १ली |
| | | ८वी ते १०वी | अपूर्व पुराणिक | उत्तेजनार्थ |
| | | | रजवी पोलाडिया | उत्तेजनार्थ |
| | | | मानसी पाळसुळे | उत्तेजनार्थ |

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१) पाटकर कॉलेज, गोरेगाव येथे मुंबई टाइम्स आयोजित मिमिक्री स्पर्धेत विधी महाविद्यालयाचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री. योगेश पाटील याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

२) रविवार दिनांक १२ डिसेंबर रोजी ठाणे बार असोसिएशनच्या विधी फाऊंडेशन व विधी महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित केली होती. न्या. श्री. अभय ओक मुंबई उच्च न्यायालय, प्रधान न्यायाधीश ठाणे श्री. मोहोड, वकील श्री. प्रभाकर भोसले अध्यक्ष ठाणे बार असोसिएशन) श्री. पाटील मुंबई यांनी वेगवेगळ्या विषयावर विचार प्रकट केले. महाविद्यालयाचे २५ विद्यार्थी तसेच ठाणे बार असोसिएशनच्या वकीलांची कार्यक्रमाला उपस्थिती होती.

३) २०, २१, व २२ डिसेंबर रोजी मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागातर्फे विधीशिक्षण या विषयावरील परिषदेस महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. विनोद वाघ व श्री. मिथुन बनसोडे उपस्थित होते.

●●●

### दिलगिरी

जानेवारी २०११ च्या अंकातील 'खासदारांची पगारवाढ-कायदा शिल्पकारांसाठी कायदा' या श्रीमती श्रीविद्या जयकुमार मॅडम यांच्या लेखाचा अनुवाद श्री. जयेश गोखले (प्रथमवर्ष विधी) यांनी केला आहे. अनवधानाने त्यांचे नाव अनुवादक म्हणून द्यायचे राहिले होते.

- संपादक

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

(मलपृष्ठ ३ वर)

पान क्र. ४० वरून

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवींवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,

**डॉ. विजय बेडेकर**

कार्याध्यक्ष

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे